# विषय सूची.


१. प्रस्तावना .... .... .... .... १-२

२. प्रवास ( मुंबईहून ग्वाल्हेर ) .... .... ३-८

३. शिंदे घराण्याचा त्रोटक इतिहास .... .... ९-१६

४. ग्वाल्हेर संस्थानचा भूगोल .... .... .... १७-१९

५. प्राचीन ( कारीगिरी ) वैभव .... .... २०-२३

६. ग्वाल्हेरचा किल्ला .... .... .... २४-३०

७. लष्कर, ग्वाल्हेर, मुरार .... .... .... ३१-३६

८. शिवपुरी .... .... .... .... ३७-३९

९. उज्जैन, चंदेरी, नरवर, पवाया .... .... ४०-५२



दा. क्र. 3234

REFBK-0003234

REFBK-0003234

# प्रस्तावना.

ह्या जगांत सौंदर्यानें नटलेलीं स्थळें हीं विश्वकर्म्याच्या उद्यानांतील रम्य फुलेंच होत. एका आंग्ल कवीनें म्हटल्याप्रमाणें अशीं कितीतरी मोहक फुलें एकीकडे जागच्या जागींच फुलतात आणि कोमेजतात. अगदीं अशीच अवस्था ग्वाल्हेर संस्थानांतल्या प्रेक्षणीय स्थळांची झाली असती पण पुण्यश्लोक कै. माधवराव महाराजांचें निसर्ग देवतेशीं इतकें तादात्म्य झालें होतें कीं त्यांनीं असल्या स्थळांचा कसून शोध करून या आड वसलेल्या सृष्टिमातेला मोठ्या गौरवानें नटवून सजवून तिची आरास आकाशांतील सुंदर नक्षत्रांच्या पसाऱ्याप्रमाणें सबंध संस्थानभर ठिकठिकाणीं करून ठेविली आहे.

ह्या व आणखी इतर प्रेक्षणीय स्थळांचें परिचय करून देणारें "गाइड" माझ्यापेक्षां एखाद्या योग्य व्यक्तीकडून ह्या पूर्वींच तयार झालें असतें तर फारच बरें झालें असतें पण दुर्दैवानें तसें अद्यापि झालें नाहीं हें खरें आहे. ग्वाल्हेरींत कधीं कधीं पायधूळ झाडणाऱ्या महाराष्ट्रीयांची असल्या पुस्तकाच्या अभावीं फार गैर सोय होत असते. ही उणीव भरून काढण्याकरितां प्रस्तुत "गाइड" लिहिण्याचें मीं धाडस केलें आहे.

दुसरें असें कीं येत्या एप्रिल महिन्यांत येथें मराठी साहित्य सम्मेलन भरविण्याचा कपिलाषष्ठीचा सुयोग आला आहे. सदर सम्मेलनाकरितां फार दुरून येणाऱ्या आमच्या महाराष्ट्रीय पाहुण्यांना चहा पितां पितां त्यांच्या परमपूज्य पाटील बुवांच्या संस्थानची विहंगम

दृष्ट्या ओळख करून देण्याकरितां हें " गाइड " आताच काहींशा तांतडीनें कांहींशा " पाहुणे येणार " म्हणून होणाऱ्या आनंदानें तयार केलें आहे.

हें काम फारच घाईनें झाल्यामुळें त्यांत चुका बऱ्याच राहिल्या आहेत आणि निरनिराळ्या प्रेक्षणीय स्थलांचीं छायाचित्रें देतां आलीं नाहीं ह्याबद्दल दिलगिरी वाटते.

मराठींत पुस्तक लिहिण्याचा माझा हा पहिलाच प्रयत्न असल्यानें वाङ्मय संसारांत सलज्ज अंत:करणानें पाऊल टाकीत आहें. सबब असल्या या अल्पकृतीचा महाराष्ट्रीय जनतेकडून प्रेमानें स्वीकार होईल अशी आशा आहे.

ताः १ एप्रिल सन १९२८ ई०. गंगाधर गणेश जोशी.

# मुंबईहून ग्वाल्हेर.

मुंबई आणि ग्वाल्हेरमध्यें सुमारें ७६३ मैलांचें अंतर आहे. मेलनें प्रवास केला असतां जवळ जवळ २५ तास लागतात.

नर्मदा नदीनें हिंदुस्थानचे निसर्गत: दोन भाग झाले आहेत—एक **दक्षिण हिन्दुस्थान** किंवा **महाराष्ट्र** व दुसरा **उत्तर हिंदुस्थान.** जी. आय. पी. रेल्वेनें महाराष्ट्रांतून येणाऱ्या मंडळीस हुशंगाबादेस नर्मदेचें दर्शन घडतें. नर्मदा नदी ओलांडतांच लडिवाळपणानें पोषण करणारा तिचा पिता विंध्याचल दृष्टीस पडतो. नर्मदेपासून भोपाळ पर्यंत नाना प्रकारचे नयनमनोहर सृष्टीजन्य देखावे पहावयास सांपडतात. भोपाळ मुसलमानी राज्य आहे. भोपाळ हा शब्द भोजपाल या शब्दाचा अपभ्रंश असावा. भोपाळचा प्रसिद्ध तलाव येथेंच असून पुण्यसलिला वेत्रवती नदी ह्याच तलावांतून निघाली आहे.

भोपाळपासून चवथें स्टेशन सांचीचें—येथें मेल ट्रेन व एक्सप्रेस थांबत नाहीं. तरी भोपाळ येथें स्टेशन मास्तरला सांगितलें असतां तो फर्स्ट व सेकंड क्लास प्रवाश्याकरितां गाडी थांबविण्याची व्यवस्था करतो. स्टेशन जवळच राहण्याकरितां एक डाक बंगला आहे. शेजारच्या डोंगरावर ई० सनाच्या पूर्वी २५० पासून ई० सन ११००

पर्यंतचे बनलेले कित्येक स्तूप आहेत. हे स्तूप प्रेक्षणीय असून इतिहास-दृष्ट्या फारच महत्वाचे आहेत. ज्या वेळीं बौद्ध धर्म राजधर्म होता त्या वेळचे हे आहेत असें इतिहासकार म्हणतात. हे स्तूप जरी सांचच्या नांवानें प्रसिद्ध आहेत तरी ते एकाच ठिकाणी नसून आसपास फार लांब पर्यंत पसरले आहेत. सांचीचा मुख्य स्तूप फारच मोठा आहे. कदाचित् त्याच्या बरोबरीचा स्तूप हिंदुस्थानांत नसेलही. हे स्तूप पहावयाकरितां परदेशाहून प्रत्येक वर्षी किती तरी प्रवासी येतात.

आतां आपण ग्वाल्हेर राज्यांत शिरूं या. सांचच्या पुढील स्टेशन भेलसा. हें फार प्राचीन शहर असून वेत्रवती नदीच्या कांठीं आहे. येथें पूर्वी एक फार मोठी तोफ होती ती हल्लीं लष्कर येथें जयविलास महालासमोर ठेविली आहे. वेत्रवती आणि बेस ह्या दोन नद्यांमध्यें भेलश्याच्या वायव्येस बेस नगर (विदिशा) नांवाचें फार जुनें शहर आहे. येथें एक गरुडस्तंभ असून त्यावर भागभद्र राजाच्या दरबारीं हेलिओडोरस नांवाचा ग्रीक वकील होता त्यानें एक वैष्णव लेख लाविला आहे. येथें प्राचीन नाणीं सांपडतात. भेलशापासून पश्चिमेस तीन मैलावर उदयागिरी पहाडांत १,५०० वर्षा पूर्वीच्या म्हणजे गुप्त-राजांच्या वेळच्या गुफा आहेत. येथें एक वराहाची फार मोठी मूर्ति असून तशी मूर्ति हिंदुस्थानांत इतरत्र क्वचितच सांपडेल. सदरहू गुफांचें नक्षी काम फारच प्रेक्षणीय आहे.

भेलशाहून बीना जंक्शन—येथून एक फांटा सागरावरून कटनीला जातो व दुसरा कोट्यापावेतों गेला असून त्या लाइनवर मुंगावली, गुना इत्यादि ग्वाल्हेर राज्यांतील स्टेशनें आहेत. मुंगावलीपासून

चंदेरी २३ मैल आहे. चंदेरी ही शिशुपाळ राजाची राजधानी होती असें म्हणतात. गुना हें आगरा बांबे रोडवर आहे.

बीन्याहून ललितपुर—येथून चंदेरीस जाण्यास सडक आहे. वाटेंत वेत्रवती नदी लागते. वेत्रवतीस रपट असल्यानें पावसाळ्यांत त्रास होतो म्हणून मुंगावलीहून पक्की सडक आहे, त्या रस्त्यानें जावें हें बरें.

ललितपुर नंतर झांशी—झांशी इतिहासप्रसिद्ध शहर आहेच. लक्ष्मीबाईनें भारतवर्षाच्या स्वातंत्र्याकरितां आत्माहुती देऊन हें नांव अमर करून ठेविलें आहे. तेव्हां त्याबद्दल पुनरावृत्ति करण्याचें प्रयोजन नाहीं. बंडा-नंतर इंग्रजांकडे ग्वाल्हेरचा किल्ला असतांना झांशीचा किल्ला ग्वाल्हेर संस्थानाच्या ताब्यांत होता. संस्थानच्या ताब्यांत ग्वाल्हेरचा किल्ला आल्यावर झांशी इंग्रजांना परत करण्यांत आली. झांशीचे गालीचे, सतरंज्या, सोनें, चांदी व पितळेचें सामान वगैरे प्रसिद्ध आहेत. झांशीहून रेल्वेच्या दोन शाखा फुटतात—(१) कानपुरला व (२) माणिकपुर-ला. झांशीहून ओरछा ६ मैल आहे. येथील राम मंदिर व रामाच्या मूर्ति अप्रतिम आहेत. येथें रामाचें दर्शन नियमित वेळींच होतें; म्हणजे सकाळीं ९ वाजतां, दुपारीं ४ वाजतां आणि रात्रीं ९ वाजतां. ह्या मूर्तींची अशी गोष्ट सांगतात कीं ओरछाची राणी रामभक्त असे. तिला एकदां रात्रीं स्वप्नांत असा दृष्टांत झाला कीं "मी अयोध्येंत शरयू नदींत आहें. मला नेऊन माझी स्थापना तुझ्या गांवीं कर." लगेच राणीनें मोठा लवाजमा पाठवून रामाच्या मूर्ति पालखींत आणवून त्यांची स्थापना केली. ही मूर्ति पुष्य नक्षत्रावर चालत असे असें

म्हणतात. राणीनें नंतर आपल्या महालाच्या समोर राम मंदिर बांधिलें. महालांतून रामाचें दर्शन सहज व्हावें अशी योजना करण्यांत आली आहे. पूर्वी ओरछा हें स्वतंत्र संस्थान होतें परंतु, हल्लीं तें टीकमगढ संस्थानांत मोडतें. ओरछा हें गांव धसान नदीच्या कांठीं असून मोडक्या दशेंत आहे. माणिकपुर लाइन वर पहिलें स्टेशन ओरछाचें आहे. येथून गांव चार पांच मैल दूर असून स्टेशनावर तांगे मिळत नाहींत सबब झांशीहून जाणें सोयस्कर आहे. झांशीहून १५० मैल माणिकपुर लाइन वर चित्रकूट आहे. झांशीहून बरमजू नांवाचें स्थान ८ मैल आहे. येथें सूर्याचें मंदिर आहे. मंदिराचे खालीं एक नदी वाहते. रविवारीं ह्या नदींत स्नान करून ओल्यानें सूर्य नारायणाची पूजा केल्यास कुष्टरोग, खरूज इत्यादि रक्तजन्य रोग बरे होतात अशी लोकांची भावना आहे. रविवारीं दर्शनाकरितां भाविक लोग लांब लांबच्या गांवाहून येथें येतात.

झांशीहून दतिया—हें एक एतद्देशीय संस्थान असून हें शहर व येथील किल्ला पाहण्यासारखा आहे.

दतियाचे पुढील स्टेशन सोनागिर—येथील पहाडीवर जैन मंदिरें फार आहेत.

सोनागिराहून चवथें स्टेशन अंतरी—येथें ओरछाच्या राजा वीरसिंह देवानें अबुलफजलचा (अकबराचा मंत्रि व कवि) खून केला त्याची कबर आहे.

अंतरी नंतर ग्वाल्हेर—(लष्कर, ग्वाल्हेर, मुरार व किल्ला यांची स्वतंत्र हकीकत पुढें दिली आहे).

इतक्या लांबचा प्रवास केल्यावर आगरा व तेथून दिल्लीपर्यंत-च्या प्रवास करण्यास मन सहाजिक धांव घेतें तेव्हां दिल्लीपावेतोंची थोडक्यांत माहिती दिल्यास अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें.

ग्वाल्हेर नंतर धोलपुर—ग्वाल्हेरपासून धोलपुर हें आठवें स्टेशन आहे. धोलपुरचा राजा जाठ राजपूत असून त्याला राणा ही पदवी आहे. (धौलपुर हें राज्य राजपूतान्यांत मोडतें.) धोलपुराहून ८ मैलावर मुचकुंद नांवाचें पुराणप्रसिद्ध व रमणीय स्थान आहे. येथून मुचकुंदास जाण्यास पक्की सडक असून जाण्या येण्यास तांगे मिळतात.

धोलपुराहून आगरा—हें जी. आय. पी., ई. आय. आणि बी. बी. सी. आय. रेलवेचें जंक्शन असल्यानें व शहर फार अफाट असल्यामुळें एकंदरींत आठ स्टेशन्स आहेत. आगरा हें शहर इतिहासप्रसिद्ध आहे व येथील व्यापार दांडगा. मोगल सम्राट अकबर ह्यानें तीन किल्ले बांधिले व तीन्ही यमुनेच्या कांठीं. हे किल्ले दिल्ली, आगरा आणि प्रयाग येथील होत. ह्या तीन्हीं किल्ल्यांत आगऱ्याचा किल्ला वाखाणण्यासारखा आहे. आगरा येथील इमारती प्रसिद्धच आहेत. शाहजहान बादशाहाचें मयूरासन पाहण्याचें सौभाग्य जरी आमच्या नशीबीं नाहीं तरी ज्या प्रचंड शिळेवर हें सिंहासन ठेविलें जात होतें ती शिळा अद्याप तेथें आहे. ह्या शिळेचा दगड काळा गुळगुळीत असून त्यांत आरशाप्रमाणें पाहणाराचें तोंड दिसतें. किल्ला सकाळीं ८-१० आणि सायंकाळीं ४-६ पर्यंत पहावयास मिळतो. किल्ला पाहण्याकरितां फी द्यावी लागते. आठ बारा

आणे दिले असतां एखादा वाटाड्या किल्ल्यांतील प्रेक्षणीय स्थळें दाखविण्याकरितां मिळूं शकतो.

कोट्यावधि रुपयांचा फडशा पाडून शाहजहां बादशाहानें आपल्या लाडक्या "बीबी" करितां बांधलेला ताजमहाल जगांतल्या सात चमत्कारांपैकीं एक असून ह्या भव्य आणि अप्रतिम इमारतीनें आपल्या जन्मदात्या जनकाचें नांव एखाद्या सत्पुत्राप्रमाणें अमर केलें आहे. ही भव्य इमारत यमुनेच्या कांठीं आहे. ताजमहाल पाहण्याकरितां फी द्यावी लागत नाहीं. ह्याशिवाय आगऱ्याच्या आसपास आणखी किती तरी इमारती आहेत. एतमादेउद्दौला, सिकंदरा (अकबरची कबर), फतेहपुर सिक्री हीं स्थळें प्रेक्षणीय आहेत. येथें संगमरमरी दगडावर कोरीव काम, जरीचें व फूलदार काम उत्तम होतें. येथील पेठा (मिठाई) प्रसिद्ध आहे.

आगऱ्याहून मथुरा—हें कृष्ण परमात्म्याचें लीलास्थान. त्याची प्रशंसा करणेंच कठिण. मथुरेचे पेढे व खाबळी प्रसिद्ध आहेत. मथुरेजवळ गोकुल, गोवर्द्धन व वृंदावन आहेत. येथील कृष्णलीला पुराणांतरीं वर्णिलेल्या आहेतच. हीं स्थानें पाहून थोडक्या वेळा करितां कां असेना मनास शांतिसुखाचा अनुभव मिळतो आणि " हे प्रभो! तूं धन्य आहेस " असे उद्गार निघाल्यावांचून राहत नाहींत. मथुरेंत यमद्वितियेचें बहिण भावाचें स्नान पुराणांत सांगितलें आहे. स्नान केल्यास यम यातना होत नाहींत. होळींत निरनिराळ्या रंगाच्या गुलालाचा बहार, कार्तिक शुद्ध १ ( अन्नकूट ) स अन्नाच्या राशीच्या राशी आणि जन्माष्टमीच्या उत्सवांत नाना प्रकारच्या सुंदर झाक्या पाहणें प्रारब्धावांचून नाहीं असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

मथुरेहून दिल्ली—दिल्लीत देखील २-४ स्टेशन्स आहेत. उतरण्याकरितां दिल्ली जंक्शन स्टेशनापासून अर्धा पाऊण मैलावर महाराष्ट्रीय स्नेहवर्धक समाजाची जागा आहे. येथें महाराष्ट्रीयांची उतरण्याची व्यवस्था मंडळी फार चांगली ठेवते. दिल्लीस जातांना दिल्ली पाहण्याची जी उत्सुकता ती दिल्लीस पाय ठेवतांच पार मावळून जाते. १८ अक्षौहिणी सैन्याचा नाश कसा झाला; द्रोण, कर्ण, भीष्म-पितामह, बालवीर अभिमन्यु याचे पराक्रम; साध्वी द्रौपदीचा छळ, पांडवांकरितां तयार केलेलें लाक्षागृह, इत्यादि एक कीं दोन शेकडों गोष्टींचें स्मरण होऊन मन उद्विग्न झाल्यावांचून राहात नाहीं. त्या गोष्टीं जरी फार जुन्या झाल्या आहेत तरी त्यांची स्मृति अद्यापि प्रत्येक खऱ्या हिंदूच्या हृदयांत ताजी आहे. बरें परवां घडलेल्या तीनशें वर्षांपूर्वीच्या ताज्या गोष्टींकडे लक्ष्य दिलें तरी हीच स्थिति—कोठें अकबर बादशहाचा मान व कोठें शेवटच्या मोंगल बादशहाचा अपमान.

दिल्लीस ऐतिहासिक स्थळें पाहण्यासारखीं पुष्कळ आहेत हें कांहीं नव्यानें सांगावयास नको. कुतुबमिनार, पुराणा किल्ला (पांडवांचा किल्ला), हुमायूंची समाधि, जुम्मा मसजिद, जंतर मंतर अर्थात् वेधशाळा, चांदणी चौक, किल्ला, व्हाइसरीगल लॉज, सेक्रेटॅरियट बिल्डिंग इत्यादि स्थळें पाहण्यासारखीं असून तांगा भाडें ३-४ रुपये आणि वेळ ६-७ तास लागतो. दिल्लीचा व्यापार आगऱ्यापेक्षांही दांडगा आहे.

ऐतिहासिक दुर्घटनांचें स्मरण होऊन मनास उल्हास न होतां उलट जास्तच त्रास होतो म्हणून मनाची धाव परत जाण्याकडे होते. सबब आपण देखील मनास न दुखवितां परत जाऊं या.

दिल्लीहून मथुरेपर्यंत आल्या वाटेनेंच परत यावें लागतें. मथुरेहून भरतपुर, बयाना, सवाई माधवपुर, कोटा, शामगढ, नागदा, रतलाम, बडोदा, भडोच, सूरत वरून मुम्बईस जातां येतें किंवा दिल्लीहून अलवर, जयपुर, अजमेर पहात पहात अहमदाबादेवरून परत आपल्या बिऱ्हाडीं जातां येतें. ह्या दुसऱ्या मार्गानें अलवर व जयपुर पाहून अजमेरीत पुष्करराजचें दर्शन घेण्याचें पुण्य पदरीं पाडतां येतें.

# शिंदे घराण्याचा त्रोटक इतिहास.

इतिहास प्रसिद्ध शिंदे घराण्याचे मूळ पुरुष राणोजी होत. पुण्याजवळ कन्हेर खेडा म्हणून एक गांव आहे तेथचे हे पाटील. घरीं माशा मारीत बसण्यापेक्षां नशीबाची परीक्षा पहावी म्हणून यांनीं पेशव्यांच्या लष्करांत चाकरी धरली. अंगीं करतबगारीची धमक व अंग मोडून काम करण्याची हौस या व इतर गुणांनीं हे मंडित असल्यानें ते पायरी पायरीनें वाढत जाऊन सरते शेवटीं माळव्याचे सुभेदार बनले. त्यांचा अंत शुजालपुराजवळ राणोगंज येथें १७४७ त झाला.

जयाप्पा हे मूर्तिमंत पराक्रम होते. त्यांनीं राजपुतान्यावर स्वारी केली त्या वेळीं मारवाडांत नागोर मुक्कामीं ई. स. १७५४ मध्यें विश्वास-घातानें त्यांचा खून झाला.

जनकोजी हे पानिपतच्या लढाईत ई. स. १७६१ मध्यें त्यांचे चुलते तुकोजी यांचे बरोबर मारले गेले. हा आधुनिक कालचा अभिमन्यूच होय.

दत्ताजी हे ई. स. १७५९ मध्यें दुराणीबरोबर लढाई झाली त्यांत मारले गेले. ते रणांगणांत घायाळ होऊन पडले असतां कुतुबशहानें नीचपणाचें प्रदर्शन करण्याकरितां त्या घायाळ वीराच्या छातीवर पाय

ऊेऊन विचारलें कीं "अब फिर लढेगा ?" त्यावर त्या नर केसरीनें असें उत्तर दिलें कीं "बचेंगे तो फिर लढेंगे."

जोतीबा हा ई. स. १७४३ त बुंदेल्यांशीं लढतांना कामीं आला. तुकोजी पानीपतच्या लढाईत मारले गेले.

ह्या नंतर महादजी आपल्या पित्याच्या गादीचे वारस झाले. ग्वाल्हेर रियासतीचा संस्थापक हाच पुरुष होय. असें म्हणतात कीं महादजी आणि दौलतराव ह्या दोन व्यक्ती त्या काळीं इतक्या महत्वाच्या होऊन गेल्या कीं त्यांच्या कारकिर्दीचें वाचन केलें असतां अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकांतल्या हिन्दुस्थानच्या इतिहासाचें सिंहावलोकन केल्याचें पुण्य पदरीं पडणार आहे.

महादजी ई. स. १७६५ मध्यें दक्षिणेंतून माळव्यांत परत आल्या नंतर त्यांनीं १७६९ मध्यें आपल्या कारकिर्दीस आरंभ केला. सर्व हिंदुस्थान मराठ्यांच्या एकछत्री अमलाखालीं आणावें असा यांचा मानस होता, पण तो सफल व्हावा अशी ईश्वरी योजना नव्हती.

ई. स. १७८२ मध्यें यांच्या कर्तृत्वशक्तीला फारच सुंदर क्षेत्र लाभलें. हिंदुस्थानच्या इतिहासांत महत्वाचा फरक घडवून आणणारा सालबईचा तह महादजीनें इंग्रजांना पाठीशीं घालून केला व त्यांत त्यांना मराठ्यांचें स्वातंत्र्य कबूल करण्यास भाग पाडलें. महादजीची कर्तबगारी व मुत्सद्दीपणा याचवेळीं सर्वांच्या प्रत्ययास आला. दोन्हीं पक्षांना समाधानकारक तह घडवून आणल्याबद्दल इंग्रजांनीं खुश होऊन त्यांना बराच प्रांत नजर केला.

तसेंच दिल्ली येथें मोगलांच्या राजकारणांत [illegible] घाकून त्यांनी तेथें महत्वाची क्रांति घडवून आणली. ई. स. १७८८ मध्यें दिल्लींतलें बंड मोडून महादजीनें तेथें स्थिरस्थावर केलें व आंधळ्या बादशहाला दिल्लीच्या तख्तावर बसवून आपण स्वत: त्याचे वजीर बनून मुसलमानी रियासतीचा कारभार पाहूं लागले. शाहआलम आंधळा व महादजी पायानें लंगडे असल्यानें लोक त्यांना " लंगडे वजीर व अंधे बादशाह " म्हणत असत. महादजीच्या या कामगिरीबद्दल हिन्दुस्थानांतला बराच मोठा भाग यांच्या छत्राखालीं आला.

महादजीनें आपल्या लष्करांत डी बॉईन सारखे लष्करी हालचालींत पूर्ण वाकबगार असे फ्रेंच अमलदार नोकरीस ठेविले होते व त्यामुळें शिद्यांचें लष्कर आधुनिक पद्धतीवर कवायत शिकून तयार झालें होतें व म्हणून इतर राजे त्यांस वचकत असत. महादजीनें राजपूतांना लालसोट व पाटन येथें चांगलेंच जेरीस आणलें व होळकरांना ई. स. १७९३ मध्यें लखेरी मुक्कामीं चांगलीच थप्पड दिली. मध्यान्हीच्या सूर्याप्रमाणें अखिल भारतवर्षाच्या राजकारणावर प्रखर प्रकाश पाडणाऱ्या महादजीचा अंत ई. स. १७९४ मध्यें पुण्याजवळ वानवडी येथें झाला. महादजी आणखी जगले असते तर मराठ्यांच्या इतिहासाला निराळेंच वळण लागलें असतें. खरोखर शिंदे घराण्याचें वैभव त्या वेळीं कळसास पोंचलें होतें.

महादजीना स्वत:चा औरस पुत्र नसल्यानें त्यांचे नातू दौलतराव गादीचे हक्कदार झाले. दौलतरावाचें वय यावेळीं केवळ १५ वर्षांचें होतें. महादजीची व दौलतरावाची तुलना केली तर एकानें कमविलें

व दुसऱ्यानें गमविलें असेंच म्हणावें लागेल. शिंद्यांच्या स्वातंत्र्याला पारतंत्राचें ग्रहण यांच्याच पासून लागलें हें खरें आहे. याबद्दल दौलतराव कितपत जबाबदार आहेत याचा निर्णय देण्याचें काम इतिहासज्ञांचें आहे. तरी पण हें असें कां झालें? याला कारणें कोणतीं! दौलतराव पराक्रमी नव्हते काय? हो, दौलतराव पराक्रमी होते, योद्धे होते, शूर होते आणि धाडसी होते. दौलतराव या गुणांनीं मंडित नसते तर त्यांची इंग्रजांशीं लढाई देण्याची छातीच झाली नसती. मग शिंद्यांच्या स्वातंत्र्याला साता समुद्रा पलीकडून येणाऱ्या मूठभर इंग्रजांनीं गट्ट कां करून टाकलें? याला कारण यांचे हेच झाले. दौलतराव आपल्या सासऱ्याच्या म्हणजे सर्जेराव घाडग्यांच्या हातांतलें बाहुलें बनले. सासऱ्यानें आपल्या जावयाला पूर्णपणें ग्रासलें होतें. सर्जेरावाच्या नादीं लागून दौलतरावांनें प्रत्यक्ष आपल्या आयांचा छळ केला व त्यांना दारोदारीं हिंडावयास लावलें. शिवाय पैसे उकळण्याकरितां पुण्यांत यांनीं जो धुमाकूळ घातला तो इतिहासज्ञांस विदितच आहे. अस्तु.

ई० स० १८०३ च्या अंजनगांवच्या तहाप्रमाणें महादजींनें कमविलेला सर्व मुलूख यांना परत करावा लागला व दौलतरावानें "सबसिडियरी सिस्टिम" चें पाणिग्रहण केलें. १८१० त यांनीं विद्यमान लष्कर शहरचा पाया घातला आणि १८२७ मध्यें त्यांचा अंत झाला.

दौलतरावानंतर त्यांचे दत्तक पुत्र जनकोजी गादीवर आले. यांच्या दुबळ्या कारकिर्दींत महत्वाच्या कोणत्याच गोष्टी घडल्या नाहींत किंबहुना ती मिळमिळीतच झाली. राजघराण्यांतील कलह आपसांतील

यादवमुळें हे विचारे जेरीस आले. यांच्या मृत्यू नंतर शिंद्यांचें इंग्रजांशी वितुष्ट आलें. जनकोजी १८४३ मध्यें मृत्यु पावले.

जनकोजी नंतर जयाजीराव गादीवर बसले. यांच्या कारकिर्दीत राज्याची वडी नीट बसविली गेली. इतकेंच नव्हे तर नव्या राज्यपद्धतीचा पाया यानींच घातला आणि याच पायावर राज्याची विद्यमान इमारत उभी टाकली आहे. स. १८५७ सालच्या बंडांत हे बंडवाल्यांना सामील न होतां इंग्रज सरकारांशीं एकनिष्टपणें वागले. या आणी-बाणीच्या प्रसंगीं रावराजा सर दिनकरराव राजवाडे यांचा राजकीय सल्ला फारच उपयोगी पडला. शिंदे बंडांत सामील झाले असते तर "हिंदुस्थानाच्या नकाशावरचा तांबडा रंग साफ पुसून टाकावा लागला असता" असें त्या वेळच्या इंग्रजी अंमलदारांचें म्हणणें आहे.

स. १८७६ मध्यें त्या वेळचे प्रिंस आफ वेल्स म्हणजे सातवे एडवर्ड बादशहा यांचें स्वागत्त महाराजांनीं आपल्यां नवीन बांधलेल्या सुंदर राजवाड्यांत—"जयविलासांत"—मोठ्या थाटानें केलें. सन १८७७ च्या दिल्ली दरबारांत हे स्वत: जातीनें हजर राहून त्यांनीं तेथें आपली व इतर राजे महाराजांची राजनिष्टा योग्य शब्दांत व्यक्त केली. यांचा अंत स० १८८६ मध्यें झाला.

कै. माधवराव महाराज हे दुसरे महादजीच होत. शिंद्यांच्या घराण्यांत औरस संततीला यांच्याच पासून प्रारंभ झाला. यांच्याच कारकिर्दीत राज्याची सर्वांगीण सुधारणा झाली. यांनीं राज्याकरितां काय केलें असा वेडगळ प्रश्न करण्यापेक्षां राज्याकरितां काय केलें नाहीं असें म्हटलें असतां आस्त शोभेल. किंबहुना यांच्या कारकि-

-ऱ्यांचा आढावा काढणें म्हणजे आकाशाला गवसणी घालण्याइतकेंच हास्यास्पद आहे. हे प्रजेला पुत्रवत् मानीत असत. प्रजेनें शांति सुखाचा पूर्ण अनुभव घ्यावा म्हणून हे अहोरात्र झटत असत. महाराज नेहमी म्हणत असत कीं मी प्रजेचा "अन्नदाता" नसून प्रजा माझी "अन्नदात्री" आहे.

इतिहासाची पुनरावृत्ति होते असें जें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. अठराव्या शतकांतले महादजी आणि विसाव्या शतकांतले माधव महाराज यांच्यांत फक्त काल भिन्नत्व आहे. नाहीं तर दोघांत मोठेंच चमत्कारिक व सुंदर साम्य आहे. एकाचे जे गुण तेच दुसऱ्याचे. दोघेही मोठे शूर, पराक्रमी व धाडसी होते. दोघेही राजकारणांत पूर्ण वाकबगार, मुत्सद्दी तर हेच. दोघांनीं इंग्रज राज्य कर्त्यांच्या गळ्यांत हात घालून चहा पति पति आपले राजकारणाचे डाव हंसत खेळत खेळून घेतले. इंग्रजांना पाठीशीं घालावें तर यांनीच.

शिवाय विधाता यांना गुणावगुणाला सारखेपणा अर्पण करून स्वस्थ बसला नाहीं. त्यानें जी मूस महादजीकरितां तयार केली होती तीच माधव महाराजाकरितां काळजीपूर्वक जपून ठेविली होती. कारण या दोघांच्या चेहरे पट्टींत देखील इतकें बेमालूम साम्य साधलें होतें कीं तसें इतरत्र क्वचितच आढळून येईल. आपण जर महादजी व माधवराव यांची छायाचित्रें जवळ जवळ ठेऊन तुलनात्मक दृष्टीनें विचार करूं लागलों तर आपल्याला काय दिसून येईल ? एकाचे जसे पाणीदार टपोरे डोळे तसेच दुसऱ्याचेही आहेत. एकाचें जसें भव्य कपाळ तसेंच दुसऱ्याचें, तीच गोष्ट नाकांची. दोघांच्या तोंडावर दैवी

तेज झळकत आहे. दोघांच्या मुद्रेवरून असें कळून येतें कीं ते स्वामिभक्त व महान ईश्वरभक्त असावेत आणि तसे होतेही. या दोघां वीर पुरुषांत तीळ उणा राहू नये म्हणूनच कीं काय महादजीचा एक पाय पानीपतच्या संग्रामांत लंगडा झाला आणि दुसऱ्याचा एन्जिनच्या अपघातानें अधू झाला होता. खरोखर महादजीचा पोशाख माधवरावांना व माधवरावांचा महादजींना घालून जर दोघांचीं छायाचित्रें घेतां आलीं असतीं तर कोण कोणता हें ओळखण्याकरितां एखाद्या कुशल आणि मर्मज्ञ चित्रकाराला बोलवावें लागतें.

माधव महाराजांची मातृभक्ति तर फारच अवर्णनीय होती. मोगल सम्राट शहाजहाननें आपल्या प्रियेच्या प्रेमानें बेहोश होऊन तिच्या करितां सुंदर ताजमहाल बांधला, यांत काय नवल ? माधवरावांनीं तर मातृभक्तींत तल्लीन होऊन आपल्या जन्म देणाऱ्या आईची स्मृती नेहमी जागृत ठेवण्याकरितां त्यांची छत्री शिवपुरींत लाखो रुपये खर्च करून उभी केली. इतकेंच नव्हे तर मरणानंतर देखील आईचें सान्निध्य लाभावें म्हणून आपली छत्री आई जवळच उभारण्याची इच्छा प्रगट केली होती आणि त्याप्रमाणें हल्लीं छत्रीचें काम चालू आहे. एकाच्या कृतींत मूर्तिमंत प्रेम आहे तर दुसऱ्याच्या कृतींत पावित्र्याचा निर्मळ झरा खळखळ वहात आहे.

अशा या थोर विभूतीचें चरित्र लिहिणें कांहीं सोपें काम नाहीं. "स्तवार्थ तुझिया तुझ्या सम कवी कधीं जन्मती" एवढें म्हणण्या-पलीकडे बिचारा लेखक अधिक काय करूं शकणार ?

जार्ज जयाजीराव—यांचा जन्म तारीख २६ जून सन १९१६ ला झाला. हे अद्याप बालवयांत आहेत. या गोड गुलाबाचा विकास

होऊन त्याचा परिमल चहूंकडे पसरायला अजून बऱ्याच अवकाशाची गरज आहे यांच्या शिक्षणाचा सर्व भार राजमातेवर आहे. शिक्षण संबंधांत त्या फार कडक नजर ठेवतात. शिक्षणाकरितां अनुभवी व विद्वान लोकांची योजना करण्यांत आली आहे. शिवाय राव साहेब लक्ष्मणराव भास्कर मुळे, एजूकेशन मेम्बर. हे नेहमीं त्यांची परीक्षा घेत असतात आणि त्यांत ज्या त्रुट्या त्यांच्या नजरेसे येतात त्यांची समजूत देऊन त्या दूर करण्याचा प्रयत्न करतात. महाराजांस मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी ह्या भाषा व इतर विषय शिकविले जातात. त्याशिवाय ड्रिल, फुटबॉल, हॉकी इत्यादि खेळ व मिलिटरीचें शिक्षण देण्यांत येत आहे. महाराज घोड्यावर चांगले बसतात व नेम मारण्यांतही कुशल आहेत. कांहीं दिवसापूर्वी त्यांनीं एका सिंहाची शिकार केली. व-याच्या मानानें हें अचाट कृत्यच म्हटलें पाहिजे. "खाण तशी माती, जाती तशा पोती" ही म्हण खोटी नव्हे. हिऱ्याच्या खाणींत हिरेच निपजणार. इंग्रजी शिक्षण देण्याकरितां विलायतेहून एक फार मोठे विद्वान गृहस्थ आले आहेत. त्यामुळें या ठिकाणीं पूर्व आणि पश्चिमेचें मधुर मीलन झालें आहे. गेल्या माधव जयन्तीच्या वेळेस महाराजानें जें निर्भीडपणानें "रिसिटेशन" म्हटलें त्यावरून ते चांगले वक्ते निपजतील ह्यांत शंका नाहीं.

कै. माधव महाराजांच्या इच्छेप्रमाणें गवर्नमेन्टनें महाराजांच्या बाल कालांत १० मेम्बरांची कौन्सिल ऑफ रीजन्सी नेमली आहे. ह्या कौन्सिलच्या प्रेसीडेन्ट मोठ्या महाराणी साहेब आहेत. कौन्सिलचें काम व्यवस्थित चालतें ही आनंदाची गोष्ट आहे.

---

# ग्वाल्हेर संस्थानची भूगोलसंबंधी माहिती.

मध्यहिंदुस्थानांत जीं लहान मोठीं संस्थानें आहेत त्यांत ग्वाल्हेर हें मोठें संस्थान आहे. ह्याचें क्षेत्रफळ २३,३८३ चौरस मैल व मनुष्यसंख्या जवळ जवळ ३२ लक्ष आहे.

जरी राजकीय दृष्ट्या ग्वाल्हेरचा संबंध मध्यहिंदुस्थानाशीं नाहीं तरी भूगोलच्या दृष्टीनें हें संस्थान मध्यहिन्दुस्थानांत मोडतें

**मर्यादा** (सीमा)—उत्तरेस चम्बल नदी जी राजपूताना व संयुक्तप्रांत यांस ग्वाल्हेरहून वेगळीं करिते; पूर्वेस संयुक्तप्रांत व मध्यप्रांत; दक्षिणेस मध्य हिंदुस्थान आणि पश्चिमेस मध्य हिंदुस्थान व राजपूताना.

**राज्य विभाग**—ह्या राज्याचे मुख्य दोन भाग आहेत—एक उत्तरी ग्वाल्हेर म्हणजे ग्वाल्हेर-ईसागढ प्रांत व दुसरा दक्षिणी ग्वाल्हेर किंवा माळवा. एकंदर ११ जिल्हे व ३९ परगण्यांत राज्याची वांटणी आहे—(१) गिर्द, (२) भिंड, (३) तवरघार, (४) श्योपुर, (५) नरवर, (६) ईसागढ हे ६ जिल्हे ग्वाल्हेरप्रांतांत व (७) भेलसा, (८) उज्जैन, (९) शाजापुर, (१०) मंदसौर, (११) अमझरा हे ५ जिल्हे माळव्याप्रांतांत मोडतात.

**प्राकृतिक स्थिति**—उत्तरी ग्वाल्हेरची जमीन चांगली सुपीक नसून उन्हाळा व हिंवाळा हे दोन्ही ऋतु कडक असतात, परंतु माळव्याची जमीन काळी सुपीक असून दोन्ही ऋतु कडक नसतात. पावसाचें मान ३०-४० इंच आहे. उत्तरी ग्वाल्हेरच्या जमीनींत पाणी मुरत नसल्यानें पिकास पाणी द्यावें लागतें व ह्याकरितां मोटमोठाले बंद व कालवे तयार करण्यांत आले आहेत.

**पहाड**—विंध्याचळ पर्वताच्या शाखा जिकडे तिकडे पसरल्या आहेत. कोणी पहाड दोन हजार फुटाहून उंच नाहीं.

**नद्या**—लहान मोठ्या बऱ्याच नद्या आहेत. त्यांपैकीं चम्बळ (चर्मणवती), बेतवा (वेत्रवती), माही (माहिष्मती), क्षिप्रा ह्या पुराणप्रसिद्ध नद्या आहेत. ह्याशिवाय सिंध, पार्वती, कुंवारी, आसन, धसान, सांक, पहूज, सींप व कून्हो ह्यांची गणणा मोठ्या नद्यांत आहे.

**पीक**—सर्व प्रकारचें धान्य ह्या राज्यांत उत्पन्न होतें. ह्यांत गहूं, कापूस, ऊस, ज्वार मुख्य होत.

**धर्म**—हिंदूंची संख्या अधिक आहे. मुसलमान, जैन, भील, गोंड, इत्यादि जंगली हे मुख्य धर्म होत. ह्याशिवाय शीख, पारशी, क्रिश्चियन, आर्य समाजी हे थोड्या प्रमाणांत सांपडतात.

**खाणी**—इमारती दगड, गेरू, खडू, अभ्रक, लोखंड इत्यादि.

**जंगल**—जंगलांत सर्व प्रकारचें लांकूड सांपडतें. अमझऱ्या जिल्ह्यांत रोसा नांवाचा एक प्रकारचा घास होतो त्यापासून तेल काढतात. हें तेल वात नाशक असतें.

**डाकघर**—मोठमोठ्या गांवांत स्टेटकडून डाकघरें आहेत व त्यांची व्यवस्था इंग्रजी डाकघराप्रमाणें आहे. ग्वाल्हेरचे पोस्ट कार्ड व टिकिट निराळे आहेत.

**सडका**—जवळ जवळ १,८०० मैल लांबीच्या सडका आहेत, राज्यांतील मोठमोठ्या गांवांला सडका असून त्यांवर डाकबंगले आहेत.

**रेलेच्या सडका**—मुख्य तीन रेलवे लाइन्स आहेत—(१) ग्रेट इंडियन पेनिन्स्युला रेल्वे, मेन लाइन मुंबईपासून दिल्लीपावेतों गेली आहे. उज्जैन-भोपाळ व बीना-कोटा ह्या ब्रेंच लाइन्स. (२) बाम्बे बडोदा एन्ड सेन्ट्रल इंडिया रेल्वे ह्याच्या शाखा—उज्जैन-नागदा, अजमेर-खांडवा, बाम्बे-देहली. (३) ग्वाल्हेर लाइट रेलवे. हिच्या ग्वाल्हेरपासून भिंड, शिवपुरी व श्योपुर अशा तीन शाखा आहेत.

**व्यापार**—व्यापाराची वाढ होण्याकरितां बऱ्याच सवलती देण्यांत आल्या आहेत. मोटमोठ्या गांवांत वर्षांतून एकदा मेळा लागतो. धान्याचे देवघेवीकरितां कित्येक ठिकाणीं पेठा आहेत.

**भाषा**—हिंदी बोलणारे सर्व राज्यांत सांपडतात. माळव्यांत माळवी बोलणारे जास्त प्रमाणांत आहेत.

# प्राचीन वैभव

यद्यपि भारतवर्षाचें प्राचीन वैभव कालवशात् कराळ काळाच्या उदरांत गडप झालें आहे तथापि सुदैवानें अद्यापि देखील आह्मांस त्या वैभवाचें अवशेष, मोडक्या रूपांत कां होईना, पहाण्यास सांपडतात. ग्वाल्हेर संस्थानांत देखील अशा प्रकारचीं ऐतिहासिक स्थळें ईसवी सनाच्या पूर्वींचीं पुष्कळ आहेत. असल्या स्थळांचें ऐतिहासिक दृष्ट्या संशोधन करण्याकरितां दरबारनें आर्क्यालाजिकल डिपार्टमेंट कायम केलें आहे. सदरहू डिपार्टमेंटनें इतिहासप्रसिद्ध ग्वाल्हेरच्या किल्ल्यांतील गुजरी महालांत एक संग्रहालय उघडलें आहे, त्यांत प्राचीन काळच्या मूर्ति, शिलालेख, शिक्के, नाणीं वगैरे ठेविलीं आहेत.

बौद्ध काळच्या जागा या संस्थानांत बऱ्याच ठिकाणीं आहेत. भेलसा जिल्ह्यांत बेसनगर व विघन, अमझऱ्यांत बाग, मंदसौर येथें खेडिया भोपा आणि नरवर येथें राजापुर.

बेसनगरचें प्राचीन नांव "विदिशा." हें गांव बौद्ध धर्माचें मुख्य केन्द्र होतें. ह्याच्या आसपास पुष्कळ स्तूप आणि विहार आहेत. ह्यापैकीं सर्वांत मोठा सांचीचा. आतां हा भोपाळ राज्यांत आहे. सांदिर, सुनारी आणि सतधारेचे स्तूप भेलशाजवळ आहेत.

दा. क्र. 3236

बाग (अमझरा) येथून २॥ मैलावर बौद्ध कालच्या गुफा आहेत. "पांडवांच्या गुफा" या नांवानें त्या प्रसिद्ध आहेत. पर्वतांना कोरून हे विहार तयार केले आहेत. या गुफा जरी हल्लीं मोडक्या स्थितींत आहेत तरी येथें जुन्या काळची कारागिरी पहावयास मिळते.

खेडिया भोपा (मंदसोर) येथील विहार पहाडाला कोरून तयार केला आहे.

ग्वाल्हेरच्या दक्षिणेंत राजापुर ( नरवर ) वांचून कोठेंही स्तूप ग्वाल्हेर प्रांतांत सांपडत नाहीं. हिंदू आणि जैन स्मारकें मात्र पुष्कळ जागीं आढळतात.

बेसनगरचा गरुडस्तंभ आणि उदयागिरीची वराह मूर्ति पहाण्यासारख्या आहेत.

सुहानिया ( तवरघार ), सुरवाया व तेरही ( नरवर ), कदवाह ( ईसागढ ) आणि उदयपुर, बडोह, व ग्यारसपुर ( भेलसा ) या सर्व जागीं ई० स. ८००-१२०० च्या काळांत बांधलेलीं हिंदू मंदिरें पहावयास मिळतात. सुहानिया येथील मंदिर व इतर अवशेष पाहिले असतां असें वाटतें कीं १०व्या आणि ११व्या शतकांत हें फार मोठें शहर असावें. माळव्याच्या उदयादित्य राजानें ११व्या शतकांत बांधलेलें उदयपुरचें उदयेश्वर महादेवाचें मंदिर फारच सुंदर आहे. त्याच वेळचीं अनेक मंदिरें कदवाह येथें आहेत. मंदसोरजवळ एकाच दगडाचे मोठे दोन खांब आहेत. हे खांब राजा यशोधर्मानें स्वतःच्या विजयस्मरणार्थ विजयस्तंभ म्हणून तयार केले असें म्हणतात. १०व्या शतकांत बांधलेलें सुरवाया, रनोद, तेरही आणि कदवाह येथील हिंदू आश्रम पाहून

असें वाटतें कीं त्या वेळचें शिल्पशास्त्र फारच सुधारलेलें होतें यांत शंका नाहीं फार कशाला ग्वाल्हेरच्या किल्ल्यांतला राजा मानसिंहाचा महाल पहा कीं तो देखील १५व्या शतकांतला राजपूत कारागिरीचा फारच सुंदर नमुना आहे.

जैनाच्या वेळचीं मंदिरें देखील या संस्थानांत कमीं आहेत असें नाहीं; ग्वाल्हेरच्या किल्ल्यांतल्या भव्य **आणि** ताडासारख्या उंच मूर्ति पाहिल्या असतां याची साक्ष सहज पटणार आहे. अशाच प्रकारच्या पण लहा मूर्ति चंदेरींत ही आहेत. जैनांचीं स्मारकें आणखी इतर ठिकाणीं पहावयास मिळतात तीं येणें प्रमाणें:—पदावली व सुहानिया (तवरघार), भीमपुर, सेसई व नरवर (नरवर), दूवकुंड (श्योपुर), इंदार, पचराई, गोलाकोट, बडोह व अहमदपुर (ईसागढ), गंधावल व मकसी (उज्जैन), नीमथोर (मंदसोर).

ग्वाल्हेर, उज्जैन व चंदेरी येथें मुसलमानी आमदानींतली कारागिरी सांपडते. उज्जैन जवळ कालियादेह येथें क्षिप्रा नदीचे पाण्याला नाना तऱ्हेचीं सुंदर वळणें देऊन त्या पाण्याला खेळविलें आहे. चंदेरी जवळ फतेहाबादचा महाल, चंदेरीची जुम्मा मसजिद आणि खास ग्वाल्हेरींत मुहम्मदगोस साहेबाची दरगाह हें मोगलांच्या वेळचें शिल्प कलेचें काम फारच सुरेख आहे.

नरवर आणि ग्वाल्हेर येथील किल्ल्यांतील इमारती प्रेक्षणीय नाहींत असें कोण म्हणेल.

उज्जैन (अवंती), बेसनगर (विदिशा), पवाया (पद्मावती), कातेवाल (कुंतलपुर), मंदसोर (दशपुर), तुमेन (तुंववन) हीं सर्व

प्राचीन शहरें आपल्या पूर्व गौरवाची साक्ष देण्याकरितां काळाला न जुमानतां एखाद्या इमानी चाकराप्रमाणें मोडक्या तोडक्या स्थितींत अद्यापि उभीं आहेत.

संशोधनाचें काम करण्याकरितां ही जमीन खोदून काढली तर प्राचीन इतिहासांतील बऱ्याच अंधारांत लपलेल्या ऐतिहासिक सत्यावर प्रकाश पडणार आहे यांत शंका नको.

---

# ग्वाल्हेरचा किल्ला.

ज्या किल्ल्याच्या आश्रयानें महाराजा दौलतराव शिंद्यानें आपल्या राज्याच्या राजधानीची स्थापना केली त्याची थोडीशी माहिती येथें देणें योग्य वाटतें. उत्तर हिंदुस्थानांत जे मोठमोठे किल्ले आहेत त्या सर्वांत हा मुख्य होय. हा एका पहाडावर असून पुराण्या लेखांत या पर्वताचें नांव गोपाद्रि, गोपगिरी, गोपाचल असें आढळतें. ह्याच्या पायथ्याशीं पूर्वीचें ग्वाल्हेर शहर आहे आणि ह्याच शहराच्या नांवावरून या किल्ल्याचें नांव पडलें असावें. या राज्यास ग्वाल्हेरचें राज्य म्हणण्याचें कारण तरी हेंच.

या किल्ल्यांत ग्वालप नांवाचे कोणी महात्मा होऊन गेले. असें म्हणतात कीं या महात्म्यानें सूर्य कुंडांतून पाणी आणून राजा सूर्यसेन कटवारचा कुष्टरोग बरा केला. त्याच सूर्यसेनानें हा किल्ला बांधला. कित्येकांच्या मतानें हा किल्ला इसवी सनाच्या तीन हजार वर्षां पूर्वीचा बनलेला आहे परंतु कित्येकांचें अनुमान असें आहे कीं हा किल्ला इसवी सनाच्या तिसऱ्या शतकांत बांधला गेला असावा.

या किल्ल्याचा ऐतिहासिक पत्ता हूण जातीच्या मिहरकुल नामक वीरानें बनविलेल्या सूर्यमंदिराच्या शिलालेखावरून लागतो. हा लेख इ० स० ५१५ चा लिहिला असावा: कारण कीं ५३३ मध्यें या राजाचा पराभव होऊन हा काश्मीरास परत गेला. त्यानंतर कनौजच्या भोज

देवानें आपला अधिकार येथें कायम केला. नंतर बरेच दिवस हा किल्ला तोमर राजपूतांच्या ताब्यांत राहिला. ह्या वंशांत मानसिंह नांवाचा फार पराक्रमी राजा होऊन गेला. हा ई०स० १४८६त गादीवर बसला आणि ह्यानें ३७ वर्षे राज्य केलें. मानसिंहानंतर हा किल्ला आणि ह्याच्या आसपासचा प्रदेश मुसलमानांच्या ताब्यांत दीडशें वर्षपर्यंत राहिला. ई० स० १७६१त पानीपतच्या लढाईनंतर गोहदचा राणा लोकेन्द्रसिंहानें मुसलमानांपासून जिंकून आपल्या ताब्यांत घेतला परंतु स० १७६५त महादजीनें गोहदच्या राण्याला जिंकून हा किल्ला आपल्या अधिकारांत घेतला. तेव्हांपासून हा किल्ला शिंद्यांच्या ताब्यांत आहे. मध्यंतरी कांहीं वर्षापावेतों राजकीय घडामोडीमुळें हा किल्ला इंग्रजांकडे होता परंतु आतां नेहमीकरितां शिंद्यांच्या कब्ज्यांत आला आहे.

ह्या किल्ल्यांतील महालापैकीं ४ हिंदू व २ मुसलमान लोकांनीं बनविले आहेत. ह्यांत सर्वांत मोठा महाल म्हणजे राजा मानसिंहाचें मानमन्दिर. हा हिंदू कारीगरीचा उत्कृष्ट नमूना आहे. हा स० १५०७ मध्यें तयार झाला. त्याच राजाचा दुसरा महाल "गूजरी महाल." हा मानसिंहानें आपल्या मृगनयना नांवाच्या राणीकरितां तयार करविला होता.

ही मुलगी गूजर जातीची होती. राजानें हिच्याशीं लग्न कां लाविलें त्याची दंतकथा अशी आहे कीं एके दिवशीं राजा शिकारीला बाहेर पडला असतां त्यानें दोन बलाढ्य म्हशींला आपसांत भांडतांना पाहिलें. इकडे एक तरुण मुलगी पाण्यानें भरलेल्या दोन घागरी आपल्या

डोक्यावर ठेऊन येत होती. हे म्हशे तिच्या रस्त्यांत आडवे आल्यानें तिनें दोन्ही म्हशांचे शिंग आपल्या हातानें धरून त्यांना वेगळें केलें. राजाला तिची शक्ति आणि धैर्य पाहून आश्चर्य वाटलें. "तुला इतकी शक्ति कोठून आली" असें राजानें विचारल्यावर तिनें सांगितलें कीं माझ्या गांवाजवळ जंगलांत एक पाण्याचा झरा आहे. हा प्रभाव त्या पाण्याचा आहे. शेवटीं त्या राजानें त्या वीरकन्येसवीरपत्नी आणि वीरमाता बनविण्याचें मनांत आणिलें. राजाचें म्हणणें तिनें ह्या अटीवर कबूल केलें कीं ह्या झऱ्याचें पाणीं ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत आलें पाहिजे. राजानें तिचें म्हणणें कबूल केलें आणि नहरानें तें पाणी किल्ल्यांत आणलें. ह्या महालांत हल्लीं आर्किअलाजीचें पदार्थ संग्रहालय आहे.

ह्याशिवाय दुसरे महाल जास्त महत्वाचे नसून त्यांची कारीगिरी देखील साधारणच आहे. शिवाय त्यांच्या संबंधी ऐतिहासिक माहिती ही विशेष नाहीं.

किल्ल्यांत मंदिरें आणि मूर्ति यांची विपुलता आहे. जैनी लोकांच्या देवतांच्या मूर्ति सर्व दूर आढळतात, परंतु मुसलमानीं अमलांत त्या छिन्नभिन्न करण्यांत आल्या. मंदिरामध्यें तीन मंदिरें पाहण्यासारखीं आहेत, पहिलीं दोन "सास बहू" च्या नांवानें प्रसिद्ध आहेत.

"सास बहू" चें मोठें मंदिर सन १०९३त तयार झालें असें त्यांतील शिलालेखावरून समजतें. हें कछवाहा वंशांतील राजा महिपालनें तयार करविलें. शिलालेखावर ह्या मंदिराचें नांव "हरिसदनं" दिलें आहे ह्यावरून हें विष्णु मंदिर असावें.

दुसरें मन्दिर ह्याच नमुन्याचें असून त्यापेक्षां लहान आहे. त्याला “ बहू ” चें मंदिर म्हणतात.

हीं दोन्ही मंदिरें भारतीय शिल्पकलेचे जिवंत नमूने आहेत. मंदिराचें कोरीव काम अद्वितीय आणि प्रेक्षणीय आहे.

तिसरें मंदिर “ तेली की लाट ” ह्या नांवानें प्रासिद्ध आहे. ही फार मोठी आणि मजबूत इमारत आहे. हिला पाहून मंदिराचा भास होत नाहीं. ह्या मंदिरावर शिखर किंवा कळस मुळींच नाहीं. तेलंग देशांत अशा प्रकारचीं मंदिरें आढळतात, परंतु उत्तर हिंदुस्थानांत हा एक अद्वितीय नमुना आहे. गरुडाच्या कित्येक सुन्दर मूर्तिवरून हें वैष्णव मंदिर असावें. हें १०व्या शतकांत तयार झालें असावें.

चवथें मंदिर सूर्यकुंडावर सूर्यनारायणाचें. येथें सूर्याचें यंत्र आहे. हें मंदिर फार प्राचीन आहे. ह्याशिवाय जहांगीरी महालांत महादेवाचें मंदिर आहे. “ जयंती थोर ” नांवाचें मंदिर अल्तमश बादशाहानें नष्ट केलें. ग्वालप मंदिर, चतुर्भुज मंदिर, मातादेवी, धोंडदेव इत्यादि लहान सहान बरींच मंदिरें आहेत. “चतुर्भुज मंदिर ” लक्ष्मण दरवाज्या जवळ आहे. येथें सं. ८७५-७६ चे पुष्कळ लेख आहे.

ह्या किल्ल्यावर पाण्याचा सांठा फार आहे. पक्के तलाव पुष्कळ असून त्यांत बरसाती पाण्याचा सांठा असतो. सूर्यकुंड हा सर्वांत मोठा तलाव आहे. दुसरा जौहर तालचे नांवानें प्रसिद्ध आहे. अल्तमश बादशाहानें ह्या किल्ल्यास ११ महिनेपर्यंत वेढा घातला तेव्हां राजा सारंगदेवानें किल्ल्याच्या बाहेर येऊन फार भयंकर युद्ध

केलें. त्यावेळेस त्याच्या ७० राण्यानीं "पहिले हमेंजु जौहर पारी, तब तुम जूझो कंथ सम्हारी" असें म्हणून आत्माहुती दिली. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ हा तलाव बांधण्यांत आला. राजा तर रणांगणांतून पार निसटून गेला परंतु त्याचे १,५०० सोबती धारातीर्थीं प्राणांस मुकले. " लक्ष्मण पोर " जवळ "अनार" व "सरद" नांवाच्या दोन बावड्या आहेत त्यांचें पाणीं गोड व थंड असून ह्या बावड्या कधींच वाळत नाहींत. ट्रेव्हरानियरनें ह्या किल्ल्याबद्दल ही विशेष गोष्ट सांगितली आहे कीं ह्यांत पाण्याचा चांगला पुरवठा आहे. ऐन साहेबाच्या कबरेजवळ किल्ल्या बाहेर एक टांकी आहे. चवथा तलाव " धोबी ताल."

उरवाइ दरवाज्या जवळ सात विहिरी आहेत. ह्या विहिरी फार खोल असून पाणी गार व गोड असतें. अशा प्रकारच्या पाण्याचा सांठा दुसऱ्या किल्ल्यावर क्वचित सांपडेल.

ग्वाल्हेरकडून किल्ल्यावर येण्यास पहिला दरवाजा म्हणजे "आलमगीरी" दरवाजा. हा स. १६६० मध्यें तयार झाला. ह्या दरवाज्याच अांत जो चौक आहे तेथें आलमगीराच्या वेळेस कचेरी होत होती. हल्लीं त्या इमारतीस " कचेरी " म्हणतात.

दुसरा दरवाजा ह्याच्या पुढें मिळतो त्याचें नांव "बादलगढ." हा १५व्या शतकाच्या हिंदु कारीगरीचा उत्तम नमुना आहे. हा दरवाजा कल्याणमल तवरच्या भावानें तयार केला होता. ह्या नंतर " हथिया पोर " जो मानमंदिराला लागून आहे. ह्या शिवाय कांहीं दरवाजे असून त्याचे चिन्ह अझून दिसतात. नंतर " भैरव

दरवाजा " लागतो आणि नंतर " गणेश दरवाजा" गणेश सिंहानें हा दरवाजा स. १४२४ मध्यें बनविला. ह्या दरवाज्याजवळ " नूरसागर " नांवाचा तलाव आहे. त्याच्या पुढें मोतमिदखां जो या किल्ल्याचा किल्लेदार होता त्यानीं बांधलेली एक मसजिद् आहे. जवळच एक लहानसें मंदिरही आहे. ह्यांतील शिलालेखावरून स्पष्ट होतें कीं पूर्वीं येथें ग्वालपाचें मंदिर होतें. हें तोडून मोतमिदखांनें मसजिद बनविली. हें लहानसें मंदिर ग्वालप या नांवानें प्रसिद्ध आहे. हें नंतर कोण्या हिन्दूनें तयार करविलें असावें.

ह्यानंतर " लक्ष्मण दरवाजा " लक्ष्मणपाळ परिहारानें पहाडाला कोरून बनविला होता. ह्या दरवाज्याजवळ चतुर्भुज मंदिर आहे. येथें कनोजचा राजा भोजच्या वेळचे दोन शिलालेख स. ९३२-९३३ चे आहेत. किल्ल्याच्या भिंतींत या मंदिराजवळ ताजनिजामची कबर आहे.

" हथिया पोर " दरवाजा जवळ हत्ती आणि माहुत यांची फार मोठी मूर्ति होती. ह्याच मुळें ह्या दरवाज्याचें नांव पडलें असावें. ही मूर्ति इब्नबूटा आणि बाबरनें पाहिली होती असें म्हणतात.

"नौचौकी" जवळ "घोंडा पोर" आहे. "नौचौकी" ती जागा आहे जेथें पूर्वीं राजकीय कैदी ठेविले जात असत. "गरगज पोर" नैर्ऋत्येस आहे. जनरल व्हाइटनें स. १८०४ मध्यें हा दरवाजा तोडला. शेवटीं "उरवाई" दरवाजा. ह्या दरवाज्यानें आतां हत्ती, घोडे मोटर, गाड्या वर जातात.

या शिवाय ह्या किल्ल्यांत मोठमोठ्या जैनी मूर्ति पहाडांत कोरले-ल्या आहेत. शिवाय किल्ल्याचे आंत वनश्रीचीं रम्य आणि मनोहर स्थानें कितो तरी पहाण्यासारखीं आहेत. एकंदरींत हा किल्ला ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्वाचा असून येथें प्रेक्षणीय स्थळें फार आहेत. हा एकच किल्ला पाहिला म्हणजे राजपूत, मुसलमान, जैन इत्यादि कालाच्या प्राचीन शिल्पकलेचें काम एकाच ठिकाणीं पहावयास सांपडतें.

---

# लष्कर, ग्वाल्हेर आणि मुरार.

ग्वाल्हेर संस्थानच्या राजधानीचें नांव लष्कर असून या शहराच्या उत्तरेस ग्वाल्हेर नांवाचें एक लहानसें गांव आहे. एके काळीं हें एक मोठें शहर होतें. श्री. दौलतराव महाराजांनीं या गांवाच्या दक्षिणेस दोन मैलांवर सैन्याच्या सुख सोईकरितां आपल्या छावणीचा तळ ई० सन १८१० त दिला. यालाच हल्लीं " लष्कर" म्हणतात.

हें शहर मुंबईहून रेल्वेनें ७६३ माईल आहे. सन १८१८ पर्यंत येथें फौजेचा तळ होता. त्या काळीं साधारण इमारती वांचून येथें कोणतीच प्रेक्षणीय इमारत नव्हती. त्यानंतर इमारतीच्या बांध कामास प्रारंभ झाला. सगळ्यांत पहिलें " सरकारी देवघर " ज्याला महाराजवाडा म्हणतात बांधण्यांत आलें. तदनंतर महाराजांच्या आश्रित सरदारांनी जेथें जेथें त्यांच्या पदकांचा तळ होता तेथेंच आपले वाडे उभे केले—उदाहरणार्थ आंग्रे साहेबांचा गोठ, निंबाळकरांचा गोठ, बक्षीचा गोठ इत्यादि. ई० सन १८२२ पासून प्रत्यक्ष शहरच्या बांध कामाला प्रारंभ झाला. सराफा स्ट्रीट त्याच वेळीं तयार झाली. एकंदर शहराची रचना शिस्त बंद नसल्यानें कै० महाराजा माधवराव साहबांनें सिटी इम्प्रूवमेंटचें काम चालू करून बरीच सुधारणा केली.

ह्या शहराचा आकार घोड्याच्या नालेसारखा आहे. शहराच्या दोहों बाजूला डोंगर असून शहराची पूर्वेकडील बाजू खुली आहे. उत्तरेकडे

ग्वाल्हेरचा भव्य किल्ला एखाद्या स्वामिनिष्ठ सेवकाप्रमाणें शहराच्या रक्षणाकरितां उभा आहे. ह्या इतिहासप्रसिद्ध किल्ल्याकडे नजर फेंकली असतां त्याच्या भव्यपणाची साक्ष पटते आणि आपल्या गत वैभवाची व ज्या आपल्या पराक्रमी पूर्वजांनीं सरकेला त्यांची आठवण होऊन क्षणभर मन उदास झाल्यावांचून रहात नाहीं. किल्ल्याच्या खालीं सरकारचा विद्यमान फूलबाग नांवाचा राजवाडा आहे. खुद्द श्रीमंतांच्या स्वाऱ्या जयविलास नांवाच्या महालांत राहतात. याच वाड्याजवळ 'मोतीमहाल' नांवाचा राजवाडा आहे. हल्लीं येथें गव्हर्नमेन्ट आफिसेज आहेत. सदर फूलबागेंत अजायबघर, जल बिहार, जमनाबाग, मोती तबेला इत्यादि प्रेक्षणीय इमारती आहेत.

फूलबागेला चार दरवाजे चारी दिशेला असून शहरांत येण्यां जाण्याकरितां नदी दरवाजा आहे. उत्तरेकडील दरवाजाला मुरार दरवाजा म्हणतात. तिसरा दाक्षिणाभिमुख ललितपुर दरवाजा आहे. या दरवाजानें बाहेर आलें असतां व्हिक्टोरिया कॉलेजची भव्य व सुंदर इमारत दृष्टीस पडते. दरवाजाच्या बाहेर डावीकडे एलजिन क्लब आहे. या क्लबाची सर्व व्यवस्था साहेबी थाटावर आहे. विश्रांतीकरितां सायंकाळीं आफिसर्स येथें जमतात. अंमळ पुढें गेल्यावर जयारोग्य नांवाचा दवाखाना आहे. ह्या दवाखान्याजवळच एक लहानशा टेकडीवर देवीचें एक सुंदर मंदिर आहे. ह्या टेकडीच्या पायथ्याशीं दसऱ्याचे दिवशीं शमी पूजा होते. खरोखरच शहराच्या ह्या भागाचा देखावा फारच सुंदर व मोहक आहे. ललितपुर दरवाज्यासमोर ५० फुट रुंदीची मुंबईच्या चर्नी रोड सारखी एक विस्तृत सडक आहे. चवथा दरवाजा पूर्वाभिमुख असून फौजेच्या

हडेल हप करितां समोरच एक विस्तृत परेड आहे. ह्याशिवाय एक नवीन दरवाजा नुक्ताच कायम करण्यांत आला आहे. ह्याचें नांव गणेश दरवाजा. हा दरवाजा आफिसजच्या मंडळीस मोतीमहालांत जाण्या येण्याकरितां आहे.

कै. माधव महाराज सर्व धर्माला समान दृष्टीनें पहात असत. त्याची साक्ष फुलबागेंत नवीन तयार केलेल्या पार्कमध्यें सांपडते. जेथें हिंदु लोकां करितां राधाकृष्णाचें मंदिर आहे तेथेंच मुसलमानांकरितां मसजिद आणि सिखलोकांकरितां गुरुद्वारा आहे. जवळ थियासॉफिकल लॉज देखील आहे.

शहरांत १८ मोठमोठे मेहल्ले आहेत. सराफा बाजार जवळ जवळ दिल्लीच्या चांदणीचौकासारखा आहे. सर्वांत मोठा रहदारीचा हम-रस्ता हाच असून इटालियन स्टाइलचे देशी दगडांचे बनलेले गोखे फारच शानदार आहेत. येथील दगडावर कोरीव काम प्रेक्षणीय आहे. दगडाच्या खाणी जवळच आहेत.

येथील हवा प्रत्येक ऋतूंत बहुधा तापदायक असून लोकांना आळशी करणारी आहे. शहरांत पाणी मुबलक असून गोड्या पाण्याच्या विहिरी जागजागीं आढळतात. आपल्या पुत्रवत् प्रजेला ताप होऊं नये म्हणून कै. माधव महाराजानें वाटरवर्क्सची स्कीम तयार केली असून ती अमलांत आली आहे. येथें रोगराई बिलकुल नाहीं असें म्हटल्यास अयोग्य होणार नाहीं. ह्यावरून शहराचें आरोग्य कसें काय आहे हें कळून येण्यासारखें आहे. प्रजेच्या सोईकरितां जाग-जागीं इंग्रजी, यूनानी आणि आयुर्वेदिक औषधांची योजना केली

आहे. ई. स १९२१ च्या सेन्ससप्रमाणें लष्करची लोकसंख्या ८०,३८७ आहे. ह्यांत हिंदूचा भरणा जास्त--मुसलमान, जैन, क्रिश्चियन, पारशी, शीख, आर्य समाजी वगैरे धर्माचे लोकही पुष्कळ आहे.

सार्वजनिक बोलण्याची भाषा हिंदी. दाक्षिणी ब्राम्हण, मराठे, पारशी इत्यादि लोक घरांत आपआपली मातृभाषा वापरतात आफिसेजची भाषा व लिपी हिंदी. रेव्हेन्यू आणि फायनेन्स डिपार्टमेंट मधें थोड्या प्रमाणांत मराठींत जमाखर्च व पत्रव्यवहार होतो.

येथें नोकरपेशा व मेहनत मजूरी करून निर्वाह करणाऱ्या लोकांचा भरणा जास्त शेतकी व व्यापार करणारे लोक फार कमी.

येथें सर्व प्रकारच्या शिक्षणाची व्यवस्था आहे. शिक्षणाकरितां एक कॉलेज, दोन हाय स्कूल्स, आणि दोन ए. व्ही. एम. स्कूल्स आहेत. मराठ्याकारितां सक्तीचें मोफत शिक्षण आहे. मुलींकारितां महाराणीज गर्ल्स स्कूल असून ट्रेन्ड मास्तरणी मिळण्याकरितां सेवासदन आहे. ट्रेन्ड शिक्षकांची पैदास नार्मल स्कूलात होते. धंधे शिक्षणाकरितां टेक्निकल स्कूल असून कारपेन्टरी, वीव्हिंग इत्यादि काम कित्येक स्कूलांत शिकविण्याची व्यवस्था आहे. सरदार व जाहागीरदारांच्या मुलांकारितां सरदार्स स्कूल आणि मुलींकारितां सरदार्स डाटर्स स्कूल आहेत. शिवाय विद्यमान कौन्सिलनें मेहरबान होऊन एज्यूकेशन आणि मेडिकल या दोन खात्यांवर जास्त लक्ष पुरविण्याविषयीं जाहिर वचन दिलें आहे.

इमारतींत जयविलास महाल, मोतीमहाल, जीजा महाराणीचा स्टेच्यु, व्हिक्टोरिया कॉलेज, जयारोग्य हास्पिटल, जयाजी महाराजांचा

स्टेच्यु, अलिजाह दरबार प्रेस, व्हिक्टोरिया मेमोरियल मार्केट, छत्र्या, डफरिन सराय, सेन्ट्रल जेल, हाटेल ( इंग्रजाकरितां ), हिंदू हाटेल, श्री कृष्ण धर्मशाळा, इत्यादि मुख्य व प्रेक्षणीय स्थळें होत.

जयविलासाचें बांधकाम इटालियन स्टाइलवर झालें आहे. या महालांत १०० फुट लांब व ५० फुट रुंद आणि ४० फुट उंचीचा एक विस्तीर्ण, भव्य आणि फारच सुंदर दरबार हाल आहे. ह्या हाल-मध्यें ठिकठिकाणी सोन्याचें नक्शी काम फारच प्रेक्षणीय आहे. ह्याच महा-लाजवळ नौतलाव नांवाचा दुसरा महाल आहे. हल्लीं येथें राजकीय पाहु-ण्यांच्या राहण्याची सोय केली आहे. मोतीमहाल पेशव्यांच्या देवघराचा नमूना आहे. येथें संगमरमरी दगडावर फारच सुंदर काम केलें आहे. जेथें हल्लीं पेलिटिकल मेंबर साहेब बसतात तेथें भिंतीवर रागरागिणी व दसऱ्याच्या प्रोसेशनचीं चित्रें भिंतीवर काढलीं असून जुन्या चित्र कलेच्या दृष्टीनें प्रेक्षणीय आहेत. व्हिक्टोरिया कालेज, जयारोग्य हास्पिटल, टेक्निकल बिल्डिंग इत्यादि इमारतीं शिल्पकलेच्या दृष्टीनें महत्वाच्या आहेत. व्हिक्टोरिया कॉलेज महाराणी व्हिक्टोरियाच्या ज्युबिली निमित्त स. १८८७ त बांधलें गेलें.

वाड्यावर जयाजी चौकांत जनरल पोस्ट ऑफिस, थिएटर ( टा-उन हाल ), व्हिक्टोरिया मेमोरियल मार्केट, हाय कोर्ट, इंपीरियल बँक ह्या सव इमारती शहराची शोभा वाढविण्याकरितां जणूंकाय आपआपसांत स्पर्धाच करीत आहेत कीं काय असें दिसतें. ह्या चौकांत संध्याकाळीं जाऊन तेथील भव्य व उंच इमारती बघून क्षणभर मुंबईचा भास झाल्या वचूनां राहत नाहीं. कै. जयाजी महाराज कधीं कधीं जयविला-

सांतून कंपू कोठींत येऊन राहत असत. हीं इमारत दखील पाहण्या-सारखी आहे.

## ( २ ) ग्वाल्हेर.

" वर सांगितल्याप्रमाणें हल्लीं ग्वाल्हेर मोडक्या स्थितींत आहे. ह्याची लोकसंख्या १३,०३७ आहे. येथील कोटेश्वरचें मंदिर, मोहम्मद गोसची दरगा व तानसेन (प्रसिद्ध गायनाचार्य) ची कबर प्रेक्षणीय आहे. तानसेनच्या कबरे जवळ एक चिंचेचें झाड आहे. त्या चिंचेचीं पानें खाल्लीं ह्मणजे आवाज खुलतो व गाण्यास मधुरता येते अशी लोकांची समजूत आहे.

## ( ३ ) मुरार

ग्वाल्हेरचे रेसिडेंट येथें राहतात. पूर्वी येथें इंग्रजी छावणी होती. हल्लीं महाराजांच्या फौजेचा बराच भाग येथें राहतो. रेसकोर्सची इमारत, एग्रिकलचरच्या इमारती, जयाजी काटन मिल इत्यादि इमारती पाहण्या सारख्या आहेत. येथें लेदर फॅक्टरी व टेनरी हे दोन कारखाने असून कामही सुरेख होतें. स. १९२१ च्या सेन्ससप्रमाणें येथील लोकसंख्या जवळ जवळ २१,००० आहे.

# शिवपुरी ( सीपरी ).

इंद्राचें नंदनवन अद्यापि कोणी पाहिल्याचें आमच्या स्मरणांत नाहीं पण वनश्रीनें नटलेली शिवपुरी पाहिली म्हणजे नंदनवनाची कांहीं कल्पना येण्यासारखी आहे.

शिवपुरी म्हणजे निसर्ग देवतेचें माहेरघर. माहेरीं मायेच्या माणसांत आल्यावर कन्येला सासरीं जावेंसे वाटत नाहीं हीच स्थिती शिवपुरीची आहे. हिचें पाळण्यांतलें नांव "सीपरी" पण तिच्या जनकानें, लाडानें कां होईना "शिवपुरी" हें नांव दिलें आहे. कन्या आणि ती बोलून चालून राजकन्या मग त्यांत ती लाडकी मग काय विचारतां. तिच्या पित्यानें तिला नटवून सजवून नाना तऱ्हेचे अलंकार घालून अशा प्रकारें विभूषित केलें कीं तिचें सौंदर्य पाहून आपल्या नेत्रांचें पारणें फेडण्याकरितां प्रति वर्षी किती तरी सृष्टि मातेचीं प्रेमळ लेंकरें येत असतात. ही बाळा देखील आपल्याला अमरत्व प्राप्त करून देणाऱ्या पित्याच्या ऋणांतून अंशतः तरी मुक्त होण्याकरितां तो थकून भागून घरी परत आला असतां त्याला गार वारा घालून श्रम परिहार करीत असे. कै. श्री. माधव महाराज उठल्या बसल्या शिवपुरींत जात असत ह्याचें इंगित तरी हेंच.

या गांवाचा इ० स० १५६४ पर्यंतचा विश्वसनीय इतिहास उपलब्ध नाहीं. ई० स० १५६४ मध्यें सम्राट अकबर मांडूहून परत येतांना

येथें आला होता. त्यावेळीं येथें जंगल आणि त्यांतलीं श्वापदें यांवाचून कांहीं नव्हतें. वनांत नाना प्रकारचे पाण्याचे पाट हल्लींप्रमाणें मंजूळ गाणी गात वहात असत. जागजागीं लहान लहान टेकड्या होत्या आणि चंदन, शाल, देवदारु यांचे विशाल वृक्ष होते. वनवासी पशुपक्षी आपल्या गर्जनेनें व कुजनानें एकच गोंधळ करीत होते. अकबरानें येथील बरेच रानटी हत्ती आपल्या बरोबर नेले. सतराव्या शतकांत हा प्रांत नरवरच्या कछवाहे राजांना जहागिरींत दिला गेला. शहाजहानाच्या कारकिर्दींत अमरसिंहानें बादशाहाशीं विद्रोह केल्याच्या आरोपावरून त्याज कडून हा प्रांत हिसकाऊन घेतला. कांहीं करारा नंतर पुन्हा हा प्रांत त्याला देण्यांत आला. ई. स. १८०० पर्यंत येथें कछवाहांचें राज्य होतें. नंतर सीपरींत शिंद्यांची सत्ता स्थापित झाली. ई. स. १८१७ च्या तहाप्रमाणें हा गांव इंग्रजांनी घेतला, परंतु पुढच्याच वर्षीं शिंद्यांनें आपल्या स्वाधीन करून घेतला. बरीच वर्षें येथें इंग्रजी छावणी होती. परंतु १८९८ मध्यें ही छावणी मोडळी.

शिवपुरीच्या नैसर्गिक गुणांवर लुब्ध होऊन कै. माधवराव महाराजांचें लक्ष तिनें सुमारें २५ वर्षा पूर्वीं वेधलें. हवा पालटण्याकरितां राजघराण्यांतील मंडळीला सिमल्यासारख्या परदेशांत जाण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून त्यांच्या दूरदर्शी मनानें शिवपुरीला हिल स्टेशनचें रूप देण्याचें घेतलें तेंव्हांपासून ह्या गांवाला आजचें वैभव प्राप्त झाले आहे. ह्या कामीं त्यांनें कोट्यावधि रुपये खर्च करून चांदपाठ्या सारखें सुंदर सरोवर, माधव विलास महाल, सेक्रेटरियट, ताजमहालाशीं स्पर्धा करणारी आपल्या पुण्यश्लोक मातोश्रीची छत्री, भूराखो, बाणगंगा,

भदैया कुंड आणि अधिकारी वर्गाकरितां सुंदर बंगले तयार करून आपलें स्मारक कायमचें येथें करून ठेविलें आहे. मेल्या नंतर देखील आपल्याला मातोश्रीचा सहवास घडावा म्हणून कै. महाराजांनीं आपली छत्री मातेच्या चरणाजवळ असावी अशी इच्छा प्रगट केल्यामुळें हल्लीं त्यांच्या छत्रीचें काम येथेंच चाललें आहे. ह्या छत्रीचें काम अपूर्व आणि प्रेक्षणीय होणार आहे. स्टेशनच्या समोर थोड्याच अंतरावर एक प्रचंड हॉटेल आहे त्यांत इंग्रजी रीतीस अनुसरून सर्व प्रकारची उत्तम सोय आहे. ह्याशिवाय सराय व धर्मशाळा उतारूंकरितां आहे.

शिवपुरी ग्वाल्हेर संस्थानचें सेनिटेरियम आहे. हें समुद्र सपाटीपासून १५१५ फूट उंच आहे. उन्हाळ्यांत देखील रात्रीं थंडगार वारा चालतो. ग्वाल्हेर लाइट रेल्वेच्या ग्वाल्हेर शिवपुरी सेक्शनचें हें टरमिनस आहे. ग्वाल्हेरपासून शिवपुरी रेल्वेनें ७२ माइल व आगरा बांबे रोडनें ६३ माइल आहे. येथून झांशीला मोटर सार्विस आहे.

---

# उज्जैन, पवाया, नरवर आणि चंदेरी.

## (१) उज्जैन.

असा कोण हिंदू असेल कीं ज्यानें उज्जैनचें नांव ऐकलें नसेल. हें फार प्राचीन शहर क्षिप्रा नदीच्या कांठीं आहे. ह्या शहराचा पत्ता ईस्वी सनाच्या कित्येक शतकापूर्वीं पासून लागतो. हल्लीं पेक्षां पूर्वीं हें फार भरभराटीचें शहर असून येथें व्यापार फार दांडगा होता.

ऐतिहासिक दृष्ट्या हें शहर फार महत्वाचें आहे. बौद्ध काला. पासून आजपावेतों या नगरीला किती धक्के सोसावे लागले हें इतिहास वाचणारांला सहज समजण्यासारखें आहे.

संवत्कर्ता महाराजा विक्रमादित्याची ही राजधानी. नंतर मौर्य, अशोक, चंद्रगुप्त दुसरा आणि कन्नौजचा हर्षवर्धन यांचे अधिकार येथें कायम झाले. १२व्या शतकापावेतों परमार राजपूतांच्या कब्ज्यांत उज्जैन राहिली. ई० स. १२३५ त अल्तमश बादशाहानें यावर कब्जा केला आणि कित्येक मन्दिरांला आणि त्यांत महाकालाचे मन्दिराला अपवित्र करून सोडलें तेव्हां पासून सन् १७४२ पर्यंत मुसलमानांचा अधिकार राहिला. सन् १७४२ पासून स. १७५० पावेतों येथें पेशव्यांचा कब्जा होता आणि तेव्हांपासून आजपावेतों शिंद्यांच्या ताब्यांत आहे. सन १७३३ त महम्मदशाहानें जयपूरचे महाराज सवाई जयसिंहास येथील सूबा नेमलें.

जयसिंह विद्वान असून ज्योतिषशास्त्राचा भोक्ता होता. त्यानें उज्जैन, जयपुर, दिल्ली आणि काशी येथें वेधशाळा स्थापित केल्या. उज्जैनची वेधशाळा जयसिंहपुऱ्यांत आहे. हा पुरा शहराच्या पश्चिमेस क्षिप्रा नदीच्या कांठीं आहे. ह्या वेधशाळेंत चार यंत्र आहेत. (१) सम्राट् यंत्र (२) नाडी वलय दाक्षिण गोल यंत्र (३) दक्षिणोत्तर भित्ति यंत्र (४) अन्य पलभा यंत्र दिगंश यंत्र सहित.

राजकीय दृष्ट्या जरी उज्जैन ग्वाल्हेर संस्थानची राजधानी नाहीं तरी माळव्याप्रांताची राजधानी आहे असें म्हणण्यास कांहीं बाधा नाहीं. मनुष्यसंख्या ४३,९०८.

येथें व्यापाराची भरभराट आहे. सूत तयार करण्याचे आणि सूती कपडे विणण्याचे कारखाने आहेत. येथील लुगडीं, खण, कुंकू, उदबत्त्या, हुक्क्याच्या कैऱ्या प्रसिद्ध आहेत.

कै. माधवराव महाराजानें लोकांच्या सोईकरितां स. १९०६ त नळाची योजना करून दिली आहे. तसेंच शहराच्या इम्प्रूव्हमेंटचें काम सपाट्यानें जारी आहे.

येथील माधव कॉलेजांत पूर्वीं बी. ए. पावेतोंचें शिक्षण दिलें जात असे मध्यंतरी मेट्रिक पावेतों शिकविण्याची व्यवस्था होती परन्तु आतां इन्टरमीजियेट क्लासेज कायम झाले आहे.

उज्जैन हें प्राचीन शहर असल्यानें येथें पुष्कळ प्रसिद्ध व जुन्या इमारती असतील अशी सहज कल्पना करितां येते आणि ही कल्पना सत्य आहे. जुन्या इमारतींपैकीं महाकालचें मन्दिर पहिल्या नंबरचें. कै. महाराजानें पूर्वांच्या मन्दिरांत पुष्कळ सुधारणा करून मन्दिराला

विशेष शोभा आणिली आहे. ह्याशिवाय भर्तृहरीची गुफा, मत्स्येन्द्रनाथ, गोपीचन्द आणि भर्तृहरीच्या मूर्ती पाहण्या सारख्या आहेत. चोवीस खंभा आणि त्याचा मुख्य दरवाजा उत्तम बनलेला आहे. क्षीर सागर, भांडेश्वर आणि गोगेश्वर महादेवांचें मन्दिर, गोपाल मंदिर, हरसिद्धी देवी, अनंत नारायण, दौलतराव महाराजांचा राजवाडा, जुम्मा मसजिद, मिरजा सेहेबाची मसजिद, मौलाना साहेबाची कबर, रूमीची कबर, क्षिप्रेच्या कांठीं शंकराची मूर्ति, राणेखांचा बाग, क्षिप्रेचे घाट, सिद्धवट इत्यादि जुनी व प्रेक्षणीय स्थलें आहेत. नवीन इमारतीपैकीं माधव कॉलेज, बिनोद मिल, नजर अली मिल, सख्याराजा धर्मशाळा इत्यादि पाहण्या सारख्या आहेत

वर्षांतून तीन मोठे मोठे मेळे लागतात. त्यांत महाशिवरात्रीचा मेळा फार मोठा असतो. ह्याशिवाय प्रत्येक १२व्या वर्षी सिंहस्थाचा मेळा होतो, त्यांत लक्षावधि मनुष्य क्षिप्रेच्या स्नानाकरितां येतात.

उज्जैनपासून थोड्याच अंतरावर क्षिप्रेच्या कांठीं भैरवगढास भैरवाचें फार जुनें स्थान आहे. येथील जेलमध्यें सतरंज्या व गालीचे उत्तम बनतात. शिवाय येथें पासोड्या रंगल्या जातात. रंग टिकाऊ व उत्तम असतो.

## (२) पवाया ( पद्मावती ).

पद्मावती, कांतिपुरी आणि मथुरा ह्या तीन राजधान्या नाग राजांच्या असण्याबद्दल विष्णुपुराणांत उल्लेख आहे. ह्या पलीकडे ह्या पुराणांत कांहींच माहिती दिली नाहीं. ह्यापेक्षां जास्त माहिती भवभूतीच्या मालती माधवांत सांपडते. ह्या भूगोल सम्बन्धी माहिती

बद्दल भवभूतीचे जितके उपकार मानावे तितके थोडेच आहे. जर ही माहिती उपलब्ध नसती तर पद्मावतीचा पत्ता लागणें कठिण झालें असतें. ती माहिती येणेंप्रमाणें:—

(१) पद्मावती ही नगरी सिंधु आणि परा ह्या दोन नद्यांनें वेष्टिली आहे.

(२) ह्या नगरीजवळ सिंधु नदीचा जलप्रपात आहे.

(३) सिंधु आणि मधुमतीचा संगम देखील ह्या नगरीजवळ आहे आणि ह्या संगमावर सुवर्णबिंदु महादेवाचें स्थान आहे.

(४) लवण नदी ह्याच नगरीजवळून वाहते.

विलसन साहेबानें पहिलें पद्मावती हीच उज्जयनी असें दाखविलें. नंतर वऱ्हाडांत असावी असें त्याचें म्हणणें कारण भवभूतीचें घर जें पद्मपुर तीच पद्मावती असावी. शेवटीं पद्मावतीला गंगेच्या कांठीं भागलपुरास नेऊन फेंकली.

विष्णुपुराणांत नागराजांच्या ज्या तीन राजधान्यांचा उल्लेख केला आहे त्यावरून कानिंगहेम साहेबानें पद्मावती मथुरेच्या जवळ पास असावी असा अन्दाज करून नरवर हीच पद्मावती असें दर्शविलें कारण नरवरच्या जवळपास चार नद्या असून नागराजांच्या वेळचीं कांहीं नाणींही तेथें सांपडलीं. जरी विलसनपेक्षां कानिंगहेम पद्मावतीच्या जवळ जवळ येऊन ठेपला तरी त्याला ठीक पत्ता लागला नाहीं हें उघड आहे. भवभूतीनें वर्णन केलेल्या चारी नद्या, सिंधु, परा,

लवण आणि मधुमती हल्लींच्या चार नद्यांशीं ( सिंधु, पार्वती, नून आणि महुअर ) जुळतात हें ओळखण्याचें श्रेय कनिंगहेमला आहे, परंतु पद्मावती हीच हल्लींचा पवाया हें जुळविण्याचें खरें श्रेय श्री. माधवराव व्यंकटेश लेले यांस आहे. पवाया नरवरच्या ईशान्येस २५ माइल आहे व जी. आय पी. रेल्वेच्या डबरा स्टेशनापासून १२ माइल आहे.

पवाया हें लहानसें गांव सिंध आणि पार्वतीच्या संगमावर आहे ह्या गांवाच्या नैर्ऋत्येस २ माइलावर सिंध नदीचा जलप्रपात आहे पवायाच्या खालीं २ माइलावर महुअर नदी सिंधला मिळते आणि ह्या संगमाजवळ एक महादेवाचें लिंग आहे आणि हेंच सुवर्ण-बिंदु महादेव असावे. नून नदी पवायापासून ४-५ माइलाच्या अंतरावरून वाहते.

जुन्या इमारतीवरून देखील समजतें कीं येथें पहिल्या किंवा दुसऱ्या शतकांतलें जुनें शहर असून तें फार भरभराटीचें असावें. नागराजांच्या वेळचीं जीं नाणीं येथें सांपडतात त्यावरून कल्पना करितां येते कीं हें शहर नागराजांच्या ताब्यांत बरींच वर्षें असावें.

दंतकथा ज्या हल्लीं प्रचलित आहेत त्यावरून देखील हेंच सिद्ध होतें. पवायाचे लोग असेंच म्हणतात कीं हें गांव पद्मावती नगरी आहे आणि प्राचीन कालीं ही एका मोठ्या राज्याची राजधानी होती. शिवाय पवायाला पद्मपवायाही ह्मणतात.

पवायाच्या आसपास खोदल्यावर बऱ्याच दूरपर्यंत जुन्या इमारती तोडक्या मोडक्या स्थितींत सांपडतात. ह्यावरून असें वाटतें

कीं जुन्या इमारतीच्या विटांनीं दुसरीं घरें तयार करण्यांत आलीं असावीं. वास्तविक पहातां सिंध नदीच्या दुसऱ्या बाजूची दोन गांवांचीं (पाचोरा आणि छिदोरी) घरें ह्याच जुन्या इमारतीच्या विटांनीं बनलेलीं आढळतात. पवायाचा किल्ला जो मुसलमानांच्या वेळेस तयार झाला असावा त्यांत बराच मसाला ह्या जुन्या इमारतीचा लागला आहे.

पावसाळ्यांत जुन्या वेळचीं नाणीं बरींच सांपडतात. गुप्त राजांच्या वेळचे कोरीव कामांचे उत्तम नमूने इकडे तिकडे पडलेले आढळतात. किल्ल्याच्या दरवाज्यापासून थोड्याच अंतरावर यक्ष माणिभद्राची मूर्ति पडलेली होती ती आतां म्युझियममध्यें ठेविली आहे. ३-४ वर्षां पूर्वीं जमीन नांगरताना ही सांपडली असें ह्मणतात. ह्याशिवाय पुष्कळ मूर्ति मोडक्या स्थितींत इकडे तिकडे पडलेल्या आहेत. ह्या गुप्तराजांच्या वेळच्या असाव्या. ह्याशिवाय पुष्कळ जुन्या इमारती अद्यापि मौजूद आहेत. ह्या ८व्या शतकाच्या नंतरच्या असाव्या. दन्तकथेवरून सिंध आणि पार्वती नद्यांच्या संगमावर बनलेला दगडी घाट परमार राजा पुण्यपाळनीं बांधला असें जरी आहे तरी नरवरच्या कछवाहे राजांच्या वेळेचा असावा. किल्ल्यांतील इमारती (महाल) अगदीं पडून गेल्या आहेत. येथील कांहीं इमारतीवरून असेंही वाटतें कीं कांहीं कालपावेतों पवाया मुसलमान बादशहांच्या ताब्यांत होता. सिंध नदीच्या जलप्रपाता-जवळ धूमेश्वर महादेवाचें मन्दिर आहे. सिंध आणि महुअर नद्यांच्या संगमावर पवायाच्या पूर्वेस दोन माइलावर एका लहान चबूतऱ्यावर

महादेवाचें लिंग आहे. कदाचित भवभूतीनें वर्णन केलेल्या सुवर्णबिन्दुचें स्थान हेंच असेल.

## ( ३ ) नरवर.

निषध देशाचा नळ राजा ह्याची राजधानी नरवर असावी असा लोकांचा समज आहे, परंतु ह्या संबंधांत साधार पुरावा नाहीं.

नरवरच्या इतिहासाचा घनिष्ट संबंध ग्वाल्हेरच्या इतिहासाशीं आहे. १०व्या शतकाच्या मध्यकालांत नरवर आणि ग्वाल्हेर कछवाहे राजपूतांच्या ताब्यांत होते. स. ११२९ त परिहारानें त्यांस हकलून लाविलें. ह्यांचा अधिकार सन १२३४ पावेतों होता. ह्या वर्षी अल्तमश बादशहानें त्यांस ग्वाल्हेरहून हकललें तेव्हां ते नरवरला येऊन राहिले.

तैमूरच्या स्वारी नंतर नरवर सन १५०६ पावेतों तवर राजपूतांच्या ताब्यांत होतें. नंतर सिकन्दर लोधीच्या अधिकारांत स. १५०८ पावेतों राहिलें. सिकन्दर लोधीनें इतक्या थोड्या अवकाशांत बऱ्याच मंदिरांची तोडमोड केली आणि त्यांच्या जागेवर मसजिदी उभारल्या. सिकन्दर लोधीने हा किल्ला राजसिंह नांवाच्या कछवाहा राजाला दिला आणि अशा तऱ्हेवर हा किल्ला पुन्हा कछवाहांच्या अधिकारांत आला. अकबरच्या वेळेस माळव्याच्या सूब्यांत नरवर मोडत असे, त्या वेळेस किल्ल्याच्या एका भागांत जुनी देवळें असल्या बद्दल अबुलफजलनें लिहिलें आहे. शहाजहां बादशीहाच्या वेळेस कांहीं काल खेरीज करून १९व्या शतकापावेतों नरवर कछवाहांच्या ताब्यांत होता आणि तेव्हांपासून शिंद्यांच्या आधिकारात आहे. नरवरचे

कछवाहे राजांचे वंशज हल्लीं ग्वाल्हेरचे जाहागीरदार म्हणून पाडोनचे राजे आहेत.

नरवरचा जुना किल्ला समुद्र सपाटीपासून एक हजार फीट उंचीच्या टेकडीवर आहे. किल्ल्यांत शाहमदार नांवाच्या एका अवलियाची दरगाह आहे. किल्ला निव्वळ मुसलमानी ढंगावर बनलेला आहे परंतु अवशेष राहिलेल्या तुटक्या मोडक्या इमारतीवरून असें स्पष्ट दिसून येतें कीं हिन्दू राजांच्या भरभराटीच्या वेळेस हा ग्वाल्हेरच्या किल्ल्याच्या खालोखाल होता. सिकन्दर लोधीच्या नासाडीमुळें किल्ल्यांत कोणतीच जुनी इमारत महत्वाची राहिली नाहीं. जयपुरच्या सवाई जयसिंहाची एक तोफ होती परंतु हल्लीं ती लश्कर येथें जयविलास महालाजवळ ठेविली आहे, या तोफेवर सन १६९६ पडला आहे.

नरवर गांव सिंध नदीच्या किनाऱ्यावर आहे. गांवा बाहेर एका खांबावर नरवरच्या तवर राजांचीं नांवें दिलीं आहेत. एक मोठी बावडी आणि सिंध नदीचे दोन पुल पाहण्या सारखे आहेत.

## (४) चंदेरी.

ग्वाल्हेर संस्थानांत जीं स्थळें ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचीं आहेत त्यांत चंदेरीची गणना आहे. बेतवा नदीच्या घाटींत जे लहान लहान डोंगर आहेत त्यांमध्यें ही वसलेली असून बऱ्याच नागमोडी रस्त्यानें म्हणजे डोंगराला वळसा घालून जावें लागतें, म्हणूनच पूर्वीच्या काळीं ही जागा फार सुरक्षित समजली जात असे. येथील देखावा फार रम्य आणि चित्ताकर्षक आहे. येथील जमीन सुपीक आणि पाण्याची विपुलता आहे.

चंदेरीस जाण्यास दोन रस्ते—एक बीना कोटा लाइनच्या मुंगावली स्टेशनावरून आणि दुसरा ललितपुराहून. मुंगावलीहून चंदेरी २३ माइल.

श्रीकृष्णाचा समकालीन जो चेदीचा राजा शिशुपाल त्याची राजधानी अशी लोकांची समज आहे; परंतु ह्यासंबंधी कोणी सप्रमाण पुरावा सांपडत नाहीं. महाभारतांत शिशुपालची राजधानी शुक्तिमती दिली आहे त्यावरून ही शिशुपालची राजधानी नसावी. जुन्या किंवा हल्लींच्या चंदेरीस कोणी असा लेख अद्यापि सांपडला नाहीं कीं ज्यावरून जुन्या इतिहासावर छाया पडेल तेव्हां बुंदेलखंडांतील कोण्या चंदेल राजाची ही राजधानी असावी असें गृहीत धरून चालणें ठीक वाटतें.

हल्लींच्या चंदेरीची वस्ती होण्यापूर्वी दुसरी चंदेरी होती आणि तिला 'बूढी चंदेरी' म्हणतात. ही ओर नदीच्या कांठीं एका पहाडीवर वसली असून हल्लींच्या चंदेरीपासून ८-९ माइल दूर आहे. ही चंदेरी आतां ओसाड आहे आणि चारीकडून अरण्यानें वेष्टिली आहे. जुन्या इमारतीचे अवशेष हल्लीं तेथें सांपडतात. ते सर्व हिंदू पद्धतीचे आहेत. गढींत मात्र एक मुसलमानी धरतीवर बनलेलो गोख आहे. १० किंवा ११व्या शतकांत बनलेलीं हिंदू आणि जैन मंदिरें येथें सांपडतात. येथें मुसलमानी इमारती मुळींच नाहीं. ह्या वरून असें वाटतें कीं मुसलमानांचा अधिकार ह्या प्रान्तांत कायम होतांच येथील लोक हें शहर सोडून हल्लींच्या चंदेरीस कायमचे येऊन राहिले असावे.

११व्या किंवा १२व्या शतकाच्या एका लेखावर प्रतिहार वंशाच्या बऱ्याच राजांची नामावली दिली आहे. त्या वरून असें वाटतें कीं त्या कालीं ह्या वंशाचा कोणी राजा चंदेरीस राज्य करीत होता. ह्याच राजाच्या वेळीं दिल्लीच्या बादशाहाच्या तर्फे उलगखानानें स. १२५१ त चंदेरीवर स्वारी केली. ह्या स्वारीचा काय परिणाम झाला हें समजत नाहीं तरी सन १३०४ पावेतों चंदेरी हिंदू राजांच्या ताब्यांत होती. नंतर अलाउद्दीन खिलजीनें त्या वर्षी चंदेरी आपल्या हस्तगत केली. १५व्या शतकाच्या प्रारंभात दिलावरखानानें त्या प्रांतातील अस्वस्थतेचा फायदा घेऊन घोरी वंशाची स्थापना केली. ह्या नंतर खिलजी बादशाहांचा अधिकार झाला आणि ह्यांच्या कारकिर्दींत चंदेरीची भरभराट होत राहिली. किल्ला वगैरे ज्या प्रसिद्ध इमारती हल्लीं दृष्टीस पडतात त्या ह्याच वेळच्या आहेत.

खिलजी घराण्याचा शेवटचा बादशाह दुसरा महमूद दुर्बल असल्यानें स. १५१२ त भुजत खानानें बादशहाच्या विरुद्ध होऊन सिकंदर लोधीला आपल्या मदतीला घेतलें. स. १५२० मध्यें चितौडच्या राणा संगानें चंदेरी आपल्या ताब्यांत घेऊन मेदिनीराय जो दुसऱ्या महमूदचा वजीर होता त्याच्या स्वाधीन केली. मेदनीरायदेखील बादशाहाचे विरुद्ध झाल्यानें स. १५२७ त बाबरानें त्यापासून हिसकली. नंतर चंदेरी मोगल बादशाहांच्या ताब्यांत आली. १७ व्या शतकाच्या शेवटीं औरंगजेबाच्या कारकिर्दींत जेव्हां मोगल साम्राज्याला उतरती कळा लागली तेव्हां हिंदू राजांनी चंदेरी परत आपल्या अधिकारांत घेतली. बुंदेले राजे स्वतन्त्र झाले. स. १८१५ पावेतों ६-७ राजांनीं राज्य केलें. ह्या वर्षी दौलत-

राव शिंद्यानें बुंदेल राजा मोर प्रल्हाद याजपासून आपल्या हस्तगत केली. चंदेरीच्या आसपास जे हिंदू महाल दृष्टीस पडतात ते ह्याच बुंदेले राजांच्या वेळचे आहेत. स. १८४४ त फौजेच्या खर्चाबद्दल गवर्नमेंटच्या स्वाधीन करावी लागली. स. १८५७ त मोर प्रल्हादच्या मुलानें ( मरदानसिंह ) चंदेरीवर कब्जा केला परंतु लवकरच सर ह्यू रोजनें परत घेतली. कांहीं मुलुखाच्या मोबदल्यांत पुन्हा महाराजा शिंदे यांस परत मिळाली.

हल्लींच्या चंदेरींत मुसलमानी आमदानीच्या पूर्वींच्या ज्या इमारती आहेत त्यांत किल्ला आणि कटीघाटीमधील खंदर पहाडांत कोरलेल्या जैन मूर्ति आहेत. ह्या १३व्या शतकाच्या प्रारंभीं तयार झाल्या असाव्या.

( १ ) **किल्ला**—एका पहाडीवर अव्यवस्थित रीतीनें बनला आहे. बुंदेल राजांच्या वेळच्या महालावांचून जुन्या इमारती ह्या किल्ल्यांत मुळींच नाहीं. किल्ला मोडक्या दशेंत आहे. कै. माधव महाराजानें किल्ल्यावर रेस्ट हाउस तयार करविलें आहे. येथून बऱ्याच दूर पावेतोंचा सृष्टिजन्य देखावा पहाण्यास सांपडतो. किल्ल्यावरून जी सडक गांवांत गेली आहे ती खूनी दरवाज्यांतून जाते. ह्या दरवाज्याला खूनी दरवाजा म्हणण्याचें कारण असें कीं ज्यांस पूर्वीं प्राणदंड देण्यांत येत असे त्यांस किल्ल्यावरून ढकलून देत आणि ते ह्या दरवाज्याच्या समोर येऊन आदळत.

(२) **दरवाजे.**—गांवाच्या चारी बाजूंला १२ ते १५ फीट उंचीची भिंत आहे. ह्या भिंतींत पांच दरवाजे व एक खिडकी आहे. ह्या भिंतींत उत्तरेस जो मुख्य दरवाजा त्याचें नांव दिल्ली दरवाजा.

3.232.

सन १४११ त तयार झाला. किल्ल्याच्या पश्चिमी टोकाखालीं गांवाच्या बाहेर एक ५० फीट उंचीचा उत्तम दरवाजा आहे. ह्याचें नांव बादल महाल परंतु ह्या दरवाज्याच्या जवळ पास कोणी महाल नाहीं. असें वाटतें कीं अशा प्रकारचे दरवाजे एखाद्या महत्वाच्या कृत्याच्या स्मरणार्थ तयार करीत असत. ईदगाह आणि कोशक महालाच्या जवळ कोरीव कामाच्या दरवाज्यांचे अवशेष हल्लीं पहाण्यास सांपडतात.

(३) **कटीघाटी.**—चंदेरीहून मुंगावलीस जाण्याच्या राजमार्गावर चंदेरीजवळ पहाडाला कोरून जो महरापदार दरवाजा आहे त्याचें नांव कटीघाटी. येथें दोन शिलालेख आहेत. त्यावरून समजतें कीं हें काम स. १४९० त शेरशहाचा मुलगा जिमनखानानें तयार करविलें.

(४) **मसजिदी.**—मसजिदीपैंकीं एक मसजिद शिल्प कलेच्या दृष्टीनें फार महत्वाची आहे. हिचें नांव जामा मसजिद. ही शहराच्या भिंतीच्या बाहेर गांवाच्या पश्चिमेस आहे. ही इमारत प्रेक्षणीय असून फार मोठी आहे.

(५) **कब्रा.**—चंदेरीस कब्रांची विपुलता आहे. येथें अगणित कब्रा असून त्यांतील कोरीव काम कीमती व प्रेक्षणीय आहे. ह्यांपैकीं शाहजादी का रोजा आणि बडा मदरसा ह्या दोन कब्रा महत्वाच्या आणि पाहाण्या सारख्या आहेत.

(६) मुसलमानी अमलात तयार झालेल्या महालापैकीं जे महाल अद्यापि अवशेष आहे त्यांत कोशक महालाची गणना आहे. हा महाल चंदेरीपासून दोन मैलावर फतिहाबादजवळ आहे. असें सांगतात कीं माळव्याच्या महमूद खिलजीनें सन १४४५ त इकडून जातांना एक सात

REFBK-0003234

मजली महाल तयार कर[illegible] ह्ल्लीं ह्या महालाचे दोन मजले साबूत आहे व दोन अर्धवट पडले आह. बाकी तीन मजले पडून नाहींसे झाले असावे.

येथें बावड्या पुष्कळ आहेत. कुवे बावड्यांच्या मानानें फारच थोडे. सर्वांत मोठी आणि पाहाण्यासारखी बावडी म्हणजे बत्तीशी बावडी-ही गांवापासून दीड मैल आहे. ही बावडी म्हणजे एक मोठा तलाव असून चारी बाजूला उतरण्यास पायऱ्या आहेत. ही सन १४८४ मध्यें तयार झाली. दुसऱ्या प्रसिद्ध बावड्या म्हणजे टप्पा बावडी (सन १४८४), गोल बावडी (सन १५०३) आणि छकला बावडी (सन १६८४).

येथें बरेच तलाव आहेत. त्यांत महत्वाचे खालीं दिले आहेत:— बिलुवा सागर, कीरत सागर, सुलतानिया ताल, लालबावडी तलाव, मानमढी तलाव, हौज खास, परमेश्वरीताल आणि तलैया.

बुंदेले राजांच्या वेळेस ज्या इमारती तयार झाल्या त्यांत खालीं दिलेल्या इमारती प्रसिद्ध आहेत. राजा का महाल, हवा महाल, दोन छत्र्या, रामाचें मंदिर. ह्याशिवाय राजपूत कारीगरीचे दुसरे महाल आहेत. रामनगर महाल, पंचमनगर महाल आणि सिंहपुर महाल. शिवाय मोठ्या आणि चांगल्या बनलेल्या बावड्या ह्याच वेळेच्या आहेत.

गांवांत १०० वर्षांच्या पूर्वीचें बनलेलें एकच जैन मंदिर आहे. ह्याचें कोरीव काम फार सुबक असून मंदिराचा नमूनाही उत्तम आहे.

प्राचीन काळापासून चंदेरी बारीक कपड्याकरितां प्रसिद्ध आहे. हल्लीं येथें बारीक कपडा सर्व तऱ्हेचा तयार होतो; परंतु हा धंदा पडक्या स्थितींत आहे.

3238